महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com MHCrimeTimes MAHCrimeTimes 9803386748 maharashtracrimetimes@gmail.com

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः ३७, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार १० डिसेंबर २०२४ ते सोमवार १६ डिसेंबर २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## महाराष्ट्र असिमीत ताकदीचे राज्य, पण थांबू नका - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### फ्लॅगशिप योजनांसाठी स्वतंत्र वॉररूम: मुख्यमंत्र्यांची घोषणा



■ मुंबई : विशाल कारंडे

महाराष्ट्र हे असिमित ताकदीचे राज्य आहे. आता आपण क्रमांक एक वर आहोत, म्हणून थांबू नका, असा मंत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या सचिवस्तरीय अधिकाऱ्यांना दिला. जुनी पुण्याई असली तरी नवी पुण्याई पुन्हा मिळवली पाहिजे, असे सांगतानाच मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी पायाभूत सुविधांप्रमाणेच राज्य सरकारच्या फ्लॅगशिप योजनांसाठीही स्वतंत्र वॉररूम सुरु करण्याचे निर्देश यावेळी दिले. विधानभवन येथील समिती सभागृहात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांची विशेष आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी सरकारच्या आगामी काळातील वाटचालीची दिशा केली स्पष्ट केली. पारदर्शकता, गतिशीलता आणि प्रामाणिकता यावर अधिक भर द्या, असे नमूद करून, मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, केंद्र सरकारच्या सहकार्याचा राज्याच्या प्रगतीसाठी पुरेपूर वापर करून घेतला पाहिजे. यासाठी अधिक समन्वय, पाठपुराव्याची व्यवस्था निर्माण करा. याकरिता नवी दिल्ली येथे महाराष्ट्र सदनाच्या माध्यमातून व्यवस्था उभी करा. एक वॉररूम पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी आहेच. ही वॉररूम आणखी कार्यक्षम करा. कोणते प्रकल्प त्यात असले पाहिजे, याची मुख्य सचिवांनी नव्याने रचना करावी. या धर्तीवर राज्यातील केंद्र आणि राज्य सरकारच्या फ्लॅगशीप योजनांसाठी पण दुसरी वॉररूम आता असेल. (शेष पृष्ठ २ वर)

## संक्षिप्त

### संजय मल्होत्रा आरबीआयचे नवे गव्हर्नर, पुढील तीन वर्षे असेल कार्यकाळ

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी संजय मल्होत्रा यांची निवड करण्यात आली आहे. ११ डिसेंबर पासून पुढील तीन वर्षांसाठी त्यांचा कार्यकाळ असणार आहे. कॅबिनेटच्या समितीने त्यांची महसूल सचिव पदी असलेल्या संजय मल्होत्रा यांची निवड रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी केली आहे. ANI या वृत्तसंस्थेने हे वृत्त दिलं आहे.सध्याचे रिझर्व्ह बँकेचे गवर्नर शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ उद्या, १० डिसेंबर रोजी संपत आहे. संजय मल्होत्रा हे १९९० च्या राजस्थान कॅडरचे IAS अधिकारी आहेत. नोव्हेंबर २०२० मध्ये ते



आरईसीचे चेअरमन आणि एमडी या पदावर नियुक्त झाले. त्याआधी ते उर्जा मंत्रालयात अतिरिक्त सचिव पदावर कार्यरत होते. २०२२ मध्ये डिपार्टमेंट ऑफ फायनान्शियल सर्व्हिसेसचे सचिव या पदावर ते कार्यरत होते. संजय मल्होत्रा यांना केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेच्या संचालक पदीही नियुक्त केलं होतं. आता त्यांना आरबीआयचे गव्हर्नर हे पद देण्यात आलं आहे. पुढील तीन वर्षांसाठी त्यांचा कार्यकाळ असणार आहे. संजय मल्होत्रा हे १९९० च्या बॅचचे आणि राजस्थान केडरचे सनदी अधिकारी आहेत. त्यांनी कानपूरमधून कंप्यूटर विज्ञान मध्ये अभियांत्रिकीची पदवी मिळवली आहे.

### स्वतःच राष्ट्रीयत्व दाखवावं लातूरच्या शेतकऱ्यांना नोटीस आल्याने राज ठाकरे संतापले, वक्फ बोर्डाला केले 'असे' आवाहन

■ मुंबई : नितीन देवळेकर

लातूरमधील १०३ शेतकऱ्यांच्या जमिनीवर वक्फ बोर्डाने दावा केला आहे. यामुळे शेतकऱ्यांना जबरदस्त धक्का बसला आहे. सर्व शेतकऱ्यांना वक्फ बोर्डाने नोटीस पाठवली आहे. नोटीस आलेल्या शेतकऱ्यांनी सरकारकडे मदत मागितली आहे. वक्फ बोर्डाची




संपत्ती इस्लामी कायद्यानुसार केवळ धार्मिक आणि लोकोपयोगी कामासाठी वापरली जाऊ शकते. महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरणानं संभाजीनगर कोर्टात याबाबत याचिका दाखल केली आहे. तर, शेतकरी या विरोधात आक्रमक झाले आहेत. यावर आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वक्फ बोर्ड जमीन प्रकरणावरुन राज ठाकरे यांनी विरोधकांवर निशाणा साधलाय. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील, तळेगाव गावातील बातमी धक्कादायक आहे. गावातील एकूण शेतजमीनीपैकी, जवळपास ७५% शेतजमिनीवर वक्फ बोर्डाने दावा सांगितला आहे.

## सेवाविषयक प्रकरणांसंदर्भात ३३ वर्षात पहिल्यांदाच 'लोक अदालत' ! ५४२ पैकी १३८ प्रकरणे निकाली

■ मुंबई : गणेश बागडे

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई व उच्च न्यायालय विधी सेवा समिती, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सरकारी कर्मचाऱ्यांची सर्व प्रकारची सेवाविषयक प्रकरणे तातडीने व सामंजस्याने मार्गी लागावी म्हणून ३३ वर्षात पहिल्यांदाच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथील कार्यालयात 'लोक अदालत' आयोजित करण्यात आली होती. या लोक अदालतीत तीनही खंडपीठ मिळून एकूण ५४२ प्रकरणांमध्ये तडजोड होऊन १३८ इतकी प्रकरणे



निकाली काढण्यात आली, अशी माहिती महाराष्ट्र प्रशासकीय न्याधिकरण, मुंबईचे विशेष कार्य अधिकारी (न्यायिक) सुरेश जोशी यांनी दिली. मेकर टॉवर, ई-विंग, तिसरा मजला, कफ परेड, जागतिक व्यापार केंद्राच्या बाजुला, मुंबई येथे मॅट च्या लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये नागपूर,मुंबई, छत्रपती संभाजीनगर खंडपीठातील ५४२ प्रकरणांपैकी १३८ निकाली निघाली. यामध्ये मुंबई खंडपीठाच्या- २३८ प्रकरणापैकी ३९ निकाली तर नागपूर- खंडपीठाच्या १५० पैकी ६३ व छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या १५४ प्रकरणांपैकी ३६ निकाली काढण्यात आली असल्याची माहितीही श्री. जोशी यांनी दिली. (शेष पृष्ठ २ वर)

## 'लाडक्या बहिणी' नावडत्या होणार? 'त्या' महिलांच्या अर्जांची होणार छाननी

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

विधानसभा निवडणूक निकालांना 'कलाटणी' देणाऱ्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेलाच कलाटणी मिळणार आहे. अडीच लाखांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न तसेच घरात चारचाकी वाहन असलेल्या महिलाही योजनेचा लाभ घेत असल्याच्या तक्रारी असून त्यामुळे आता अर्जांची छाननी केली जाणार आहे. छाननीनंतर नियमबाह्यपणे अर्ज बाद केले जातील, अशी माहिती माजी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी



'लोकसत्ता'ला दिली. यामुळे १५ ते २० टक्के, म्हणजे ३५ ते ५० लाख महिलांना लाभावर पाणी सोडावे लागण्याची शक्यता आहे. महायुती सरकारच्या शपथविधी सभारंभानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'लाडकी बहीण योजना' कायम राहणार असल्याचे जाहीर केले. तसेच आर्थिक नियोजनात योग्य प्रकारे सुसूत्रता आल्यानंतर वाढीव हप्ता दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्याच वेळी निकषाबाहेरील महिला योजनेचा गैरफायदा घेत असल्याच्या अनेक तक्रारी आल्याची माहिती आहे. (शेष पृष्ठ २ वर)

## राहुल नार्वेकर पुन्हा विधानसभा अध्यक्ष; 'मी पुन्हा येईन' न म्हणता परत आलात, फडणवीसांचे चिमटे

■ मुंबई : यश सावंत

महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची फेरनिवड झाली. बिनविरोध निवडीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन प्रस्तावावेळी नार्वेकरांची चौफेर तारीफ केली. मी पुन्हा येईन, असं तुम्ही म्हणाला नव्हतात. पण तरीही आपण परत आलात, याचा आनंद असल्याचं फडणवीस म्हणाले. नाना पटोलेंचे विशेष आभार, तुम्ही वाट मोकळी केल्यामुळे मागच्या वेळी ते अध्यक्ष बनू शकले, असा टोलाही फडणवीसांनी लगावला. विधानसभेचे सर्व सदस्य आणि महाराष्ट्रातील तमाम १२ कोटी जनतेच्या वतीने राहुल नार्वेकर यांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्रात काही अपवाद वगळता सातत्याने विरोधीपक्ष नेत्याची निवड बिनविरोध करण्याची परंपरा विरोधीपक्षाने राखली आहे. याचा मान राखत




आपल्या निवडीला पूर्ण समर्थन दिल्याबद्दल विरोधीपक्षाच्या सर्व सदस्य आणि गटनेत्यांचे आभार मानतो, असं फडणवीस म्हणाले. मी पुन्हा येईन, असं तुम्ही म्हणाला नव्हतात. पण तरीही आपण परत आलात, याचा मला मनापासून आनंद आहे. एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असताना त्यापैकी एक वकील होता. आता तुमच्यामुळे ५०-५० टक्के झालं आहे. तुमच्यासारखा निष्णात वकील अध्यक्षांच्या खुर्चीत बसला आणि न्याय देण्याचं काम तुम्ही कराल, यात शंका नसल्याचंही फडणवीस म्हणाले. राहुल नार्वेकर हे पहिलेच अध्यक्ष असतील जे पहिल्याच टर्ममध्ये अध्यक्ष झाले, आणि लगोलग दुसऱ्या टर्ममध्येही अध्यक्ष झाले. नाना भाऊंचे विशेष आभार. तुमच्यापेक्षा ते तसे लहान आहेत १३-१४ वर्षांनी, माझ्यापेक्षाही लहान आहेत.


## नो पार्किंग झोनमध्ये बेकायदा वाहने लावल्यास आता दंड आणि 'टोईंग'चा भुर्दंड


■ पिंपरी-चिंचवड : महेश पानसरे

वाहतूक विभागाचा आदेश झुगारून नागरिकांकडून 'नो पार्किंग झोन'मध्ये, रस्त्यावर, जागा मिळेल त्या ठिकाणी



बेकायदा वाहने लावली जात असल्याने वाहतूककोंडीत भर पडत आहे. ही कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी टोइंग व्हॅन प्रकल्प कार्यान्वित केला आहे. अशा पद्धतीने वाहन लावल्यास टोइंगचा खर्च, वस्तू आणि सेवा करासह (जीएसटी) दंड वसूल केला जाणार आहे. दुचाकीसाठी ७३६ रुपये, तर चारचाकीसाठी ९७२ रुपये दंड आकारला जाणार आहे. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत चाकण, भोसरी, तळेगाव हे औद्योगिक क्षेत्र, हिंजवडी, तळवडे ही माहिती आणि तंत्रज्ञान नगरी असून देहू आणि आळंदी तीर्थक्षेत्रे आहेत. यासह मोठ्या बाजारपेठा, तसेच शैक्षणिक आणि व्यापारी संकुले आहेत. त्यामुळे शहरातील रस्त्यांवर वाहनांची वर्दळ असते. दुचाकी, तसेच चारचाकी वाहनांचा वापर करणाऱ्या नागरिकांची संख्याही मोठ्या प्रमाणात असून, अनेकजण दुचाकी आणि चारचाकी वाहनांचा वापर करीत असतात. मात्र, काही जण पार्किंगचे नियम न पाळता बेशिस्तीने कोठेही वाहन पार्क करतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. अशा वाहनांवर पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाकडून कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. दुचाकीसाठी ५०० रुपये दंड, २०० रुपये टोइंग शुल्क, (शेष पृष्ठ २ वर)







# राजकीय स्थिरतेचे फडणवीस पर्व

महाराष्ट्राच्या राजकीय पटावरील मोठ्या उलथापालथीनंतर मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधी सोहळ्याचा तो क्षण राज्याच्या इतिहासात सुवर्णाक्षिरांनी लिहिला गेला. वर्षानुवर्षे राजकीय घडामोडींचा साक्षीदार असलेला महाराष्ट्र यावेळीही एका अभूतपूर्व राजकीय नाट्याचा साक्षीदार ठरला. अनेक दिवसांपासून प्रचंड तणाव, अटकळ आणि रणनीती यांचा परिपाक म्हणून जेव्हा देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली, तेव्हा महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिक हा सोहळा पाहत असताना वेगवेगळ्या भावनांचा अनुभव घेत होता.

या शपथविधीने केवळ एका राजकीय यशाची नोंद केली नाही, तर ते एका व्यवस्थात्मक स्थैर्याचेदेखील प्रतीक ठरले. हा शपथविधी केवळ एक औपचारिक सोहळा नव्हता, तर तो राजकारणातील संयम, तडजोड आणि दीर्घकालीन दृष्टिकोनाचा कळस होता. तो एका मोठ्या लढाईच्या समाप्तीचा आणि नव्या प्रवासाच्या सुरुवातीचादेखील अलौकिक क्षण होता. शपथविधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अनेक आठवणींनी महाराष्ट्राच्या जनतेला भारावून टाकले होते. मागील अडीच वर्षांपासूनची सत्तास्थापनेची लढाई, 'साम, दाम, दंड, भेद' या नीतीने हाताळलेली राजकीय रणनीती आणि अनेकदा घडलेल्या अनपेक्षित वळणांनी महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळ कायमच चर्चेत राहिले, मात्र या सोहळ्याच्या निमित्ताने प्रत्येक जण आपल्या मनाशी एकाच प्रश्नाचा शोध घेत होता तो म्हणजे पुढील काही वर्षे राज्याचे भवितव्य कसे असेल? ते कसे असेल याची भविष्यवाणी आताच करणे धाडसाचे ठरेल, मात्र नेतृत्वाच्या कसोटीत तावून-सुलाखून निघालेल्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या हातात राज्याचे भवितव्य स्थैर्य प्राप्त करणारे असेल हे एव्हाना स्पष्ट झाले आहे. हा 'वृद्धी' योग जनतेच्या कल्याणातही वृद्धी आणि स्थैर्य प्राप्त करेल अशी अपेक्षा. खरंतर राज्याच्या राजकीय इतिहासात अनेकदा सत्तासंघर्ष आणि त्यातील गुंतागुंतीने वेगळ्या वाटा तयार केल्या आहेत, मात्र यावेळच्या घडामोडी वेगळ्या ठरल्या. त्या केवळ सत्तेच्या खेळापुरत्या मर्यादित नव्हत्या. त्या नेतृत्वगुणांची परिपक्वता, विविध गटांचे संतुलन राखण्याची क्षमता आणि व्यापक लोकहिताचा विचार यांचे दर्शन घडवणाऱ्या होत्या. या नाट्याला एका मोठ्या संघर्षाचा रंग होता, ज्यामध्ये प्रत्येक नेत्याची भूमिका त्याच्या व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत होती. महाराष्ट्राच्या विधान भवनातील प्रांगणात उभ्या असलेल्या व्यासपीठावर एकीकडे फडणवीसांच्या चेहऱ्यावर यशाचा, प्रगल्भतेचा आविष्कार होता, तर दुसरीकडे उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतलेल्या एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या चेहऱ्यावर त्यांची राजकीय कार्यकुशलता आणि कणखरता झळकत होती. सत्ताकारणाच्या या खेळात या तीनही नेत्यांनी आपापल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली तेव्हा त्यांचा संयम आणि पक्षावरील निष्ठा पुन्हा एकदा अधोरेखित झाली. त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून अडीच वर्षांपासून पार पाडलेली भूमिका ही केवळ राजकीय तडजोड नव्हती, तर सत्तेसाठी तात्पुरती मागे हटण्याची आणि मोठी राजकीय योजना प्रत्यक्षात उतरवण्याची ती तयारी होती. अडीच वर्षांपूर्वी जेव्हा ते उपमुख्यमंत्रीपदी नियुक्त झाले तेव्हा त्यांनी कोणतीही नाराजी व्यक्त केली नाही.



# ईव्हीएम, बॅलेट पेपर, हॅकर्स अन् गोंधळ!




**विधानसभा निवडणुकीची मतमोजणी २३ नोव्हेंबर रोजी झाली आणि निकालात महाविकास आघाडी भुईसपाट झाली. महायुतीला संपूर्ण बहुमत मिळाले. मात्र, हे अनपेक्षित यश असल्याची आणि 'दाल में कुछ काला हैं' याची चर्चा सुरू झाली. ज्या महाविकास आघाडीने लोकसभा निवडणुकीत घवघवीत म्हणजे ४८ पैकी ३१ जागा जिंकल्या होत्या त्या महाविकास आघाडीला ५० हून कमी जागांवर विजय मिळाला, ही बाब कुणाला पटत नाही. विशेष म्हणजे या निकालानंतर भाजपसह महायुतीकडून म्हणावा तसा विजयी जल्लोष झाला नव्हता. त्याचवेळी ईव्हीएमवर शंका उपस्थित करत विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर खापर फोडायला सुरुवात केली. हा विजय महायुतीचा नसून ईव्हीएमचा असल्याचा थेट आरोप विरोधकांनी केला. त्यावर ईव्हीएमवर विश्वास नसेल तर राजीनामा द्या, असे रोखठोक उत्तर सत्ताधाऱ्यांनीही दिले आहे.**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला जबरदस्त यश मिळाले. ४८ पैकी तब्बल ३१ जागांवर विजय मिळवून भाजपसह महायुतीची दाणादाण उडवून दिली होती. तसेच यश विधानसभा निवडणुकीत मिळेल, अशी अपेक्षा महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांची होती. प्रत्यक्षात चित्र पालटले. महायुतीला न भुतो न भविष्यती असे यश मिळाले. त्यांना संपूर्ण बहुमत मिळाले आणि महविकास आघाडीला विरोधी पक्ष म्हणूनही अपेक्षित यश मिळाले नाही. त्यानंतर ईव्हीएममध्ये घोळ करून विजय मिळवल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून सतत होत आहे. वास्तविक महायुतीला मिळालेले यश खरोखरच अनपेक्षित आहे. या विजयानंतर महायुतीने आनंद व्यक्त केला असला तर भाजप किंवा महायुतीकडून जो जल्लोष अपेक्षित होता तसा झालेला नाही, हे सर्वांच्या लक्षात आले आहे. अनेक उमेदवारांना त्यांचा विजयही अनपेक्षित वाटला. त्यामुळे हा विजय ईव्हीएमचा आहे महायुतीचा नाही, अशी टीका विरोधकांनी सुरू केली. एवढेच नाही तर ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याचे आव्हानही त्यांनी सत्ताधाऱ्यांना दिले आहे. अर्थातच हे सर्व निकालानंतरचे नाट्य असल्यामुळे केंद्रीय निवडणूक आयोग याकडे अजून तरी गांभीर्याने पाहात नसल्याचे दिसते. सध्या ईव्हीएमवरून महाविकास आघाडीविरुद्ध महायुती यांच्यात जोरदार घमासान सुरू आहे. दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. त्यातच सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस मतदारसंघातील मारकडवाडी या गावाची भर पडली आहे. माळशिरस मतदारसंघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उत्तमराव जानकर विजयी झाले आहेत. मात्र, त्यांना अपेक्षित आघाडी मारकडवाडी गावातून न मिळाल्यामुळे ग्रामस्थांनी ईव्हीएमवर शंका उपस्थित करून बॅलेट पेपरवर ३ डिसेंबर रोजी मतदान घेण्याचा निर्णय जाहीर केला होता. एका छोट्याशा गावातून थेट ईव्हीएमला आव्हान मिळाल्याने जिल्हा प्रशासनाने त्यांचा हा प्रयत्न हाणून पाडला. काही ग्रामस्थांविरोधात गुन्हे दाखल केले. त्याचा परिणाम आणि ईव्हीएमवरील शंका आणखी दृढ झाली. या गावात ग्रामस्थांनी बॅलेट पेपरवर मतदान घेऊन त्यांचा निकाल जाहीर केला असता तर सरकारला किंवा निवडणूक आयोगाला काय फरक पडला असता, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मुळात हे मतदान अधिकृत नव्हते. तरीही सरकारने मतदान होऊ दिले नाही. नेमका हा मुद्दा हाताशी धरत मविआमधील मुख्य नेते शरद पवार यांनी मारकडवाडीत जाऊन ग्रामस्थांचे मनोधैर्य वाढवले. निवडणूक पद्धत बदलली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी तिथे मांडली. एकूणच राज्यात ईव्हीएमसंदर्भात अनेक प्रश्न उपस्थित होत असून ईव्हीएमच्या विश्वासाऱ्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. महाविकास आघाडीने ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अशातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जुना व्हिडीओ व्हायरल होत आहेत, ज्यात बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी ते करताना दिसत आहेत. तसेच ईव्हीएम हॅक होऊ शकते, असे नितीन गडकरी म्हणालेत, ती बातमी सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. थोडक्यात, विरोधात असताना भाजपने आणि आता विरोधात असताना कॉंग्रेससह इतर विरोधकांनीही ईव्हीएमवर शंका उपस्थित केली आहे. त्यामुळे ही शंका दूर करण्याची जबाबदारी आता केंद्रीय निवडणूक आयोगाची आहे. हिरकणीमुळे रायगड किल्ल्याच्या सुरक्षेतील कच्चा दुवा लक्षात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी हिरकणीचा सत्कार केला होता आणि किल्ल्याची तटबंदी आणखी मजबूत केली. तसेच ईव्हीएममध्ये दोष असतील, तर तज्ज्ञांकडून तपासून त्यातील दोष दूर करण्याची जबाबदारीही त्यांची आहे. जेणेकरून कुठल्याही निवडणुकीत ईव्हीएमवर कुणीही प्रश्नचिन्ह उपस्थित करता कामा नये. कारण लोकशाहीमध्ये लोकांचा विश्वास फार महत्त्वाचा असतो, त्याला तडा जाता कामा नये. मुळात आपल्याकडे गुप्त मतदान पद्धती आहे. लोक आपले मत विश्वासाने देत असतात. त्यामुळे ज्या उमेदवाराला मतदाराने आपले मत दिले आहे, त्यालाच ते गेले पाहिजे. जर मतदान यंत्रात काही संभावित बदल करून ते अन्य उमेदवाराकडे जात असेल तर ते योग्य नव्हे. ती त्या मतदाराची फसवणूक आहे. लोकांचे लोकांनी लोकांसाठी चालविलेले राज्य अशी लोकशाहीची व्याख्या आहे. त्यामुळे व्यवस्थेवरचा लोकांचा विश्वास अखंड राहणे महत्त्वाचे आहे. त्रुटी असतील तर त्या दूर करायला हव्यात. आता या आरोप-प्रत्यारोपांच्या जुगलबंदीत सत्ताधाऱ्यांनी विरोधकांवर बाजी उलटवली आहे. जर आता तुम्हाला ईव्हीएमवर शंका वाटते तर लोकसभेचा निकाल जाहीर झाला तेव्हा ईव्हीएमच्या विश्वासाऱ्हतेवर काहीच का बोलला नाही, असा थेट सवाल महायुतीचे नेते करत आहेत. यात चुकीचे काहीच नाही.

महाविकास आघाडीला ईव्हीएमवरील लोकसभेचा निकाल मान्य असेल तर विधानसभा निवडणुकीचा निकाल ते कसे अमान्य करू शकतात, असा प्रतिप्रश्न महायुतीचे नेते वारंवार करत आहेत. या सर्वांमध्ये आणखी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे.

# मोबाईलमध्ये अडकलेली माणसे



राजधानी मुंबईतल्या मंत्रालय आणि विधानभवन परिसरातील राजकीय घडामोडींनी वेग घेतला आहे. खातेवाटप, शपथविधी, मंत्रीपदावरून होणाऱ्या वाटाघाटी, मुत्सद्दी चर्चा, बैठका आणि 'अनाकलनीय' विजयाच्या राजकारणाने हा परिसर भारून गेला आहे. याच परिसरात अगदी मंत्रालयाच्या समोर आणखी एक अ-राजकीय परंतु तेवढ्याच चिंतेची आणि दखल घेण्यासारखी दुसरी 'अनाकलनीय' घटना घडली आहे. घटना तशी छोटीच आहे, मात्र अनाकलनीय यासाठी की, आजपर्यंत अशी घटना घडलेली नव्हती.

'अमूक एका वाहनाची माणसाला धडक' हा मथळा कुठल्याही वर्तमानपत्रातल्या किंवा वृत्तवाहिन्यांमध्ये नियमित असतो. परंतु 'माणसाची वाहनाला धडक' असा मथळा वाचकापुढे आल्यास शब्दांची ओळीतली जागा बदलल्यानं बातमीचा अर्थच बदलून गेल्यानं ही 'उपसंपादकाची डुलकी' असावी असा संशय घेण्यास जागा आहे. पण या मथळ्यात 'तसं' काहीच चुकलेलं नाही, अगदी असं खरंच घडलं आहे, आणि हे सगळं घडलं आहे, ते ठिकाणही महाराष्ट्राचा कारभार जिथून चालवला जातो त्या अगदी थेट मंत्रालयासमोरच, मंत्रालय परिसर हॉर्नचा कलकलाट आणि महागड्या वाहनांनी नेहमीच गजबजलेला असतो. मुंबईतल्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या अनेक बसेस मंत्रालयाजवळील बसस्थानकात विसावतात, या मंत्रालयीन परिसराचे कमालीचे महत्त्व असल्याने वाहतूक पोलीस आणि शहर पोलिसांचा या ठिकाणी कायम बंदोबस्त असतो, त्यामुळे बेशिस्त वाहतुकीच्या घटना आणि अपघातांचे प्रमाण तुलनेने कमीच असते, मात्र शुक्रवारच्या ऐन दुपारी एका नागरिकाने मोबाईलच्या तंद्रीत चक्क बेस्ट बसला धडक दिली. बेस्टची ११३ क्रमांकाची प्रवासी बस बॅकबे बस डेपोकडे जात असताना मंत्रालयासमोर आली असता रस्त्यावरून मोबाईलवर बोलणारी एक पादचारी व्यक्ती बसच्या मागील बाजूस अचानक धडकली, यात ही व्यक्ती जखमी झाल्याने त्यांना नागरिकांनी तातडीने जे.जे. रुग्णालयात दाखल केले. आता या अपघाताची माहिती घेण्याचे काम बेस्ट आणि वाहतूक पोलिसांकडून सुरू झाले आहे. बेस्ट बसने झाडाला, कारला किंवा विजेच्या खांबाला धडक दिल्याच्या बातम्या याआधी अनेकदा वर्तमानपत्रात येऊन गेल्या आहेत. परंतु एखाद्या माणसाने बेस्ट बसला धडक दिल्याची ही बातमी पत्रकारितेच्या इतिहासात कदाचित पहिलीच असावी, म्हणून या बातमीचे महत्त्व आहेच. 'ड्रंक अँड ड्राईव्ह' किंवा 'हिट अँड रन' च्या घटनेत बरेचदा मद्यपानाचा मेंदूवर चढलेला कैफ कारण ठरतो, त्यामुळे मद्यपान करून होणारे अपघात आणि वाहन चालवताना मोबाईलवर बोलताना होणारे अपघात एकाच तागडीत तोलणे अन्यायकारक ठरेल, वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे ही एक कला आहे. ज्येष्ठ साहित्यिक चिं.वि.जोशींच्या भाषेत मोटारीच्या सुकाणू चाकावर (स्टेअरिंग व्हील) वर हात असताना मोबाईलवरील ध्वनीक्षेपकाद्वारे संवाद साधणे ही एक कलाच आहे.

पान १ वरुन...

## महाराष्ट्र असिमीत...

त्यातून सर्वसामान्य लोकांपर्यंत लाभ गतीने पोहोचले पाहिजे. यासाठी प्रयत्न करता येतील. यात जनता दरबार, लोकशाही दिन कार्यक्रम वेगाने हाती घ्या. हे कार्यक्रम सुरू झालेच पाहिजे, ते तळागाळात नेले पाहिजेत. आपले सरकार पोर्टल पुन्हा नव्याने पूर्ण क्षमतेने चालविण्यात यावे. जिल्ह्यांच्या पालक सचिवांनी आपापल्या जिल्ह्यांचे तातडीने दौरे सुरु करावेत. पालक सचिवांनी आपल्या अनुभवाचा फायदा त्या-त्या जिल्ह्यांना करून देण्यावर भर द्यावा. वेगवेगळ्या विभागाचे पोर्टल अपडेट करा. ते अधिक प्रभावी करा. त्यातून लोकांना शक्य तितक्या सेवा घरबसल्या कशा मिळतील, यावर भर दिला पाहिजे. अर्थातच यात उत्कृष्ट काम करणाऱ्या विभागांना मंत्रिमंडळ बैठकीत सन्मानित करण्यात येईल, असेही मुख्यंत्र्यांनी सांगितले. राज्य शासनाची सर्व संकेतस्थळ हे आरटीआय फ्रेंडली करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. ते म्हणाले की, 'इज ऑफ लिव्हिंग'वर सर्वाधिक भर द्या. राज्यभरातून नागरिक सर्वाधिक कोणत्या कारणासाठी आपल्याकडे येतात आणि त्यांना त्या सेवा घरबसल्या कशा मिळतील, यावर भर देण्यासाठीचे नियोजन केले जावे. यासाठी सहा-सहा महिन्याचे दोन टप्पे करून उद्दिष्ट गाठता येईल. यासाठी निवृत्त अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा फायदा घेता येईल, त्यासाठी त्यांची एक समिती गठीत करून अभ्यास अहवाल तयार करण्यात यावा. कर्मचाऱ्यांच्या तक्रारींकडे प्राधान्याने लक्ष देण्यात यावे. त्यांचा थेट सचिवांशी संवाद व्हावा आणि त्यातून त्यांच्या समस्यांचे निराकरण व्हावे, यावर भर देण्यात यावा. नवीन नियुक्त कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. त्यानंतरच त्यांना त्यांच्या सेवेशी संबंधित जिल्ह्यात पदस्थापना दिल्या जाव्यात. जेणेकरून त्यांना काम करणे सोपे होईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. नागरिकांना सुविधा देण्यासाठी तसेच, प्रशासकीय कामांसाठी तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याची सूचना देऊन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी त्यासाठी प्रत्येक विभागाने शंभर दिवसांचा कार्यक्रम तयार करून तो सादर करावा, असे निर्देशही दिले.

## सेवाविषयक प्रकरणांसंदर्भात...

मुख्य सचिव सुजाता सौनिक, यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागातील सचिव यांनी लोक अदालत यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता मोलाचे सहकार्य केले. मंत्रालयातील प्रत्येक विभागातर्फे नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली, त्यामुळे लोक अदालतीसमोर ठेवण्यात आलेल्या प्रकरणांच्या बाबतीत शासनाशी संपर्क साधणे सोयीचे झाले. तसेच बरीच वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची मुख्य सादरकर्ता अधिकारी स्वाती मणचेकर यांनी तपासणी केली व शासनाने नियुक्त केलेले नोडल अधिकारी यांच्यामार्फत प्रलंबित प्रकरणे लोक अदालत समोर ठेवण्यासाठी योग्य ठरविण्यात आली, असेही विशेष कार्य अधिकारी (न्यायिक) सुरेश जोशी यांनी सांगितले. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबईच्या अध्यक्षा न्यायमूर्ती मृदुला भाटकर, यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामधील सर्व अधिकारी, कर्मचारी, मुख्य सादरकर्ता अधिकारी तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण बार असोसिएशनमधील सर्व वकील वर्ग, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामधील वकील आणि शासनाचे सर्व नोडल अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या स्थापनेनंतर ३३ वर्षांनी प्रथमच लोक अदालत झाली. लोक अदालतसाठी तीन पॅनल आयोजित करण्यात आले होते. लोक अदालतीचे पॅनल प्रमुख म्हणून न्यायमूर्ती विनय जोशी, ए. पी. कुन्हेकर, सेवानिवृत्त सदस्य (न्या) आर. बी. मलिक, सेवानिवृत्त सदस्य (न्या) व पॅनल सदस्य म्हणून नितिन गद्रे, सदस्य (प्र), मप्रन्या, नागपूर, विजयकुमार, निवृत्त सदस्य (प्र), मप्रन्या, औरंगाबाद, विजया चौहान, संदेश तडवी, निवृत्त सहसचिव, आर. एम. कोलगे, वकील आणि एम.बी. कदम, वकील यांनी काम पाहिले.

## 'लाडक्या बहिणी' नावडत्या...

त्यामुळे अर्जांची छाननी सुरू करण्यात आली असून २ कोटी ३४ लाख लाभार्थीपैकी १५ ते २० टक्के महिला अपात्र ठरण्याची शक्यता आहे. प्रारंभी कुटुंबातील केवळ एका महिलेसाठी असलेली ही योजना नंतर मतांच्या बेगमीसाठी २१ ते ६५ वय असलेल्या कुटुंबातील सर्व महिलांसाठी लागू करण्यात आली. महिलेचे बँक खाते आणि कुटुंबाचे एकूण उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी या दोन प्रमुख अटी होत्या. राज्यातील पात्र वयोगटातील चार कोटी ७ लाख महिला मतदारांपैकी दोन कोटी ४७ लाख महिलांनी योजनेसाठी अर्ज केले होते. राज्य सरकारने या योजनेसाठी एकूण ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. निवडणूक काळात अर्ज दाखल केलेल्या १३ लाख महिलांचे बँक खाते आधार कार्डशी जोडण्यात आले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीत लवकरच लाभार्थीना डिसेंबरचा हप्ता देण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली जाईल. दहा लाख रुपयांचे उत्पन्न घेणाऱ्या अनेक महिला या योजनेचा लाभ घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. खऱ्या गरजवंतांनाच रक्कम मिळावी, या उद्देशाने पुढील तीन महिन्यांत अर्जांची छाननी केली जाईल आणि अधिक उत्पन्न असलेल्या महिलांची नावे योजनेतून वजा केली जातील, अशी माहिती मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी दिली.

***लाडकी बहीण योजनेत काही गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहे. विशेषतः मर्यादेपेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या महिलाही योजनेचा लाभ घेत आहेत. आता अर्जांची छाननी केली जाईल. त्यात अनियमितता आढळल्यास त्या लाभार्थीला बाद केले जाईल. — आदिती तटकरे, माजी महिला व बालकल्याण मंत्री***

## नो पार्किंग झोनमध्ये...

३६ रुपये जीएसटी असे ७३६ रुपये, तर चारचाकी वाहनांसाठी ५०० रुपये दंड, ४०० रुपये टोइंग शुल्क आणि ७२ रुपये जीएसटी असा ९७२ रुपये दंड आकारला जात आहे. टोइंग केलेल्या वाहनावर पूर्वीचे चलन आहे का, याची वाहतूक पोलीस तपासणी करतील. प्रलंबित चलनांपैकी एक आणि आताच्या कारवाईचे एक चलन किमान भरणे बंधनकारक असणार आहे. पूर्वी ५०० रुपये दंड, २०० रुपये टोइंग चार्ज, ३६ रुपये जीएसटी असा एकूण ७७६ रुपये दंड आकारला जात होता. आता दुचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी स्वतंत्र दंडाची रक्कम आकारली जात आहे. वाहनचालकांनी पार्किंगच्या नियमांचे पालन करावे. नो पार्किंगमध्ये तसेच वाहतुकीला अडथळा होईल अशा पद्धतीने वाहन लावल्यास संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे. वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी ही कारवाई केली जात असल्याचे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी सांगितले.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.**

**ई-निविदा सूचना क्रमांक १७ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ **योग्य कंत्राटदारांकडून** खालील कामाकरीता ब -१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **www.mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | मुंबई उपनगर जिल्हांतर्गत शासकीय जमीन नगर भुमापन क्र. १/२ मौजे बॉम्बे सोप फॅक्टरी, मानखुर्द येथील क्रिडांगणासाठी पुढील व डाव्या बाजूस आरसीसी संरक्षक भिंतीचे बांधकाम व जमीनीचे प्रारंभिक परिक्षण (चाचणी अहवाल) करणे. | रु.२,०६,३८,८७४.००/- |
| २. | मुंबई उपनगर जिल्हांतर्गत शासकीय जमीन नगर भुमापन क्र. १/२ मौजे बॉम्बे सोप फॅक्टरी, मानखुर्द येथील क्रिडांगणासाठी उजव्या बाजुस व मागच्या बाजूस आरसीसी संरक्षक भिंतीचे बांधकाम व जमीनीचे प्रारंभिक परिक्षण (चाचणी अहवाल) करणे. | रु.२,०९,११,००७.००/- |

**ई - निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १. | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक **०६/१२/२०२४** @ १५.०० पासून दिनांक **२०/१२/२०२४** @ १५:०० पर्यंत. |
| २. | प्री-बीड मिटींग | दिनांक **१३/१२/२०२४** @ १५.०० वाजता अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर,मुंबई-४०००७१ यांचे कार्यालय |
| ३ | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक **२३/१२/२०२४** @ १५.०० वाजता (शक्य झाल्यास) अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर,मुंबई-४०००७१ यांचे कार्यालय |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

**जा. क्र. साबांविप्र-आरे/नि.लि./**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२९२७२४४७**
**दिनांक:-**

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.**

**डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४९२७**

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# दुसऱ्या टप्प्यात पॉड टॅक्सीची शीव रेल्वे स्थानकापर्यंत धाव, १६ स्थानकांचा समावेश

■ **मुंबई : गणेश बागडे**

वांद्रे रेल्वे स्थानक ते कुर्ला रेल्वे स्थानक असा ८.८ किमीचा पॉड टॅक्सी प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) हाती घेण्यात आला आहे. प्रकल्पाचा हा पहिला टप्पा असून या टप्प्याचे काम २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे. अशात आता या प्रकल्पाचा दुसऱ्या टप्प्याअंतर्गत बीकेसी ते शीव रेल्वे स्थानक असा विस्तार केला जाणार आहे. मात्र या विस्तारित मार्गासंबंधीचा अंतिम निर्णय होण्यास तसेच कामास सुरुवात होण्यास बराच वेळ लागणार आहे. त्यामुळेच या विस्तारित मार्गाच्या पूर्णत्वासाठी २०४१ चे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. असे असले तरी पॉड टॅक्सीचा बीकेसी ते शीव रेल्वे स्थानक असा विस्तार झाल्यास त्याचा मोठा फायदा प्रवाशांना होणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वांद्रे-कुर्ला संकुलातील वाहतूक कोंडीचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी एमएमआरडीएने अत्याधुनिक अशा पॉड टॅक्सीचा पर्याय स्वीकारला आहे. त्यानुसार कुर्ला रेल्वे स्थानक ते वांद्रे पूर्व रेल्वे स्थानक अशी पॉड टॅक्सी सेवा सार्वजनिक-खासगी सहभागातून विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वयंचलित जलद वाहतूक प्रणालीअंतर्गत ८.८ किमीच्या मार्गाच्या उभारणीचे, देखभाल आणि संचलनाचे कंत्राट हैद्राबादमधील साई ग्रीन मोबिलिटी प्रायव्हेट लिमिटेडला देण्यात आले आहे. या कंपनीने या प्रकल्पासाठी लंडनमधील हिथ्रो विमानतळावर पॉड टॅक्सीची सेवा देणाऱ्या मे. अल्ट्रा पीआरटी कंपनीची मदत घेतली आहे.



या दोन्ही कंपन्यांच्या माध्यमातून सध्या प्रकल्पासाठी आवश्यक त्या परवानग्या घेण्याचे काम सुरु आहे. या परवानग्या मिळाल्यास प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. पॉड टॅक्सीचा पहिला टप्पा २०२७ पर्यंत पूर्ण करत हा टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन आहे. अशात आता पहिल्या टप्प्यातील या मार्गाचा विस्तार करण्याचे एमएमआरडीएचे नियोजन असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. बीकेसी ते शीव रेल्वे स्थानक असा १३.५ किमीने पॉड टॅक्सीचा दुसऱ्या टप्प्याअंतर्गत विस्तार केला जाणार आहे. याबाबत एमएमआरडीएच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी प्राथमिक स्तरावर ही चर्चा सुरु असून यासंबंधीच्या अंतिम निर्णयासाठी बराच वेळ लागणार असल्याचे म्हणत अधिक माहिती देण्यास नकार दिला आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पॉड टॅक्सी प्रकल्पाच्या अहवालामध्ये दुसऱ्या टप्प्याबाबतची माहिती नमूद आहे. त्यानुसार १६ स्थानकांचा हा विस्तारीत पॉड टॅक्सी मार्ग असणार असून हा टप्पा २०४१ पर्यंत कार्यान्वित केला जाणार आहे.

## नाना पटोलेंचा महायुतीवर आरोप; 'महाराष्ट्रात लोकशाहीचा दिवसाढवळ्या खून, आमची ७६ लाख मतं....'

■ **मुंबई : यश सावंत**

महाराष्ट्रात महायुतीला महाप्रचंड यश मिळालं आहे. तर महाविकास आघाडीच्या ४७ जागा येऊ शकल्या आहेत. दरम्या विरोधक हे अजूनही पराभवाच्या धक्क्यातून बाहेर आलेले नाहीत. कारण काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी महायुतीने ७६ लाख मतं मिळवली कशी काय? असा सवाल उपस्थित केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सुरुवातीला आकडे दाखवत आमचे आमदार कमी कसे आणि सत्ताधारी आमदार कमी मतं मिळून जास्त कसे काय? हा प्रश्न विचारला. त्यावर त्यांना देवेंद्र फडणवीस यांनी गणित मांडूनच उत्तर दिलं. आता नाना पटोले यांनी महायुतीचं सरकार कसं आलं हा लोकांनाही पडलेला प्रश्न असल्याचं म्हटलं आहे.

खारं तर एकट्या मारकडवाडीचाच विषय नाही. प्रत्येक गावात हा विषय निर्माण आहे. आलेलं सरकार हे जनतेच्या मनातलं आणि मतातलं नाही. हे सरकार कसं आलं याचाच लोकांना प्रश्न आहे. अनेक गावांमध्ये ग्रामसभांची प्रक्रिया सुरु झाली आहे. याची दखल मुख्यमंत्री कशी काय घेणार? निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालयाने याची दखल घेतली पाहिजे. दिवसाढवळ्या लोकशाहीचा खून होणं आणि अशा पद्धतीने असंतोष समोर येणं याची दखल न्यायालयाने घेतली पाहिजे आणि निवडणूक आयोगाने घेतली पाहिजे असं नाना पटोले यांनी म्हटलं आहे. मॉक पोलिंगचा दृष्टीकोन घेऊन सध्या लोक काम करत आहेत. जनतेच्या भावना अशा आहेत की हे सरकार जनतेच्या



मनातलं नाही. आमची मतं चोरली गेली आहेत. रात्रीतून ७६ लाख मतं वाढली आहेत तिथेच हा सगळा खेळ दिसून आला. जनभावना मांडण्यासाठी हे सभागृह आहे. जनभावना मांडण्याचं काम आम्ही शनिवारी केलं. आमची लढाई विधानसभेतही लढू आणि रस्त्यावरही लढू. प्रतीकात्मक निषेध नोंदवत आम्ही शनिवारी आमदारकीची शपथ घेतली नव्हती. आज आम्ही सगळ्या आमदारांनी मात्र शपथ घेतली आहे. माझं मत हे माझा अधिकार आहे. मतदान केल्यानंतर आपला काही अधिकार उरतो की नाही? शेतकरी पुन्हा सीमेवर जमले आहेत.

## कर परताव्यातील विलंबामुळे सरकारी तिजोरीवर व्याजाचा वाढता बोजा, उच्च न्यायालयाकडून चिंता व्यक्त

■ **मुंबई : सम्यक कासारे**

**प्राप्तिकर परताव्याच्या प्रक्रियेतील विलंबामुळे सार्वजनिक तिजोरीवर वाढत असलेल्या व्याजाच्या बोजाबद्दल उच्च न्यायालयाने नुकतीच चिंता व्यक्त केली. तसेच, परतावा देण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्याला जबाबदार धरून त्याच्यावर कारवाई करण्याची सूचनाही कर विभागाला केली आहे.**

एकदा करदात्याला परताव्याचा हक्क मिळाला आणि त्या संबंधात करदात्याच्या विरोधात महसुलाच्या उद्देशाने कोणतीही कार्यवाही केली जात नाही, तेव्हा कर रकमेचा परतावा करनिर्धारणकर्त्याला त्वरीत मंजूर केला जाणे आवश्यक आहे. या नियमाची अंमलबजावणी व्हायला हवी, असेही न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने उपरोक्त चिंता व्यक्त करताना स्पष्ट केले. प्राप्तिकर परताव्याच्या प्रक्रियेतील विलंब हा प्रामुख्याने कर अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे किंवा हलगर्जीपणामुळे होतो, परंतु, त्यामुळे सार्वजनिक तिजोरीवर भरीव व्याज देयकांचा भार पडतो, असे देखील न्यायालयाने म्हटले. ब्लूमबर्ग डेटा सर्व्हिसेस (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडने २०१३-१४ आणि २०१६-१७ या मूल्यांकन वर्षासाठीचा ७७.६४



कोटी रुपयांचा परतावा मिळण्यात झालेल्या विलंबाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यावरील सुनावणीच्या वेळी न्यायालयाने कर परताव्यातील विलंबामुळे सरकारी तिजोरीवरील व्याजाच्या वाढत्या बोजाबाबत चिंता व्यक्त केली. कर परतावा अन्यायकारकपणे रोखण्यात आल्याचा दावा करून २०२३-२४ या वर्षातील परताव्याचे समायोजन रद्द करण्याची तसेच या वर्षासाठी लागू व्याजासह परतावा त्वरीत देण्याचे आदेश अधिकाऱ्यांना द्यावेत, अशी मागणी कंपनीने केली होती. महत्त्वपूर्ण रक्कम देय असूनही परतावा वेळेवर देण्यात आला नाही. न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर, २९ नोव्हेंबर रोजी ७७.६४ कोटी रुपयांचा आंशिक परतावा देण्यात आला. हा परतावा त्यानंतरच्या मूल्यांकन वर्षामध्ये समायोजित केला गेला. परंतु, या रकमेवरील व्याज अद्याप देण्यात आलेले नाही, असेही कंपनीच्या वतीने न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. मूल्यांकन वर्ष २०१६-१७ आणि २०१३-१४ साठी देय असलेले ३.१० कोटी रूपयांच्या व्याजाची रक्कम अद्याप मंजूर केलेली नाही. परतावा देण्यास होणाऱ्या या विलंबाने केवळ याचिकाकर्त्यावरच परिणाम होत नाही, तर सार्वजनिक तिजोरीवरील आर्थिक बोजा देखील वाढत आहे. विलंब झालेल्या परताव्यावरील व्याजाचा खर्च सार्वजनिक तिजोरीला सहन करावा लागत असल्याचा युक्तिवाद कंपनीतर्फे करण्यात आला.

## मुबलक पाण्याची प्रतीक्षाच! सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचे ९० टक्के काम पूर्ण

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पातील दुसऱ्या टप्प्याचे काम संथगतीने सुरू आहे. त्यामुळेच दुसरा टप्पा कार्यान्वित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला आहे. 'एमएमआरडीए'ने सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पातून पहिल्या टप्प्याअंतर्गत वसई-विरार महापालिकेसाठी पाणी सोडण्यास सुरुवात केली आहे. या प्रकल्पाअंतर्गत मीरा-भाईंदर शहराला पाणीपुरवठा



(एमएमआरडीए) मुदत गाठता येणार नसल्याचे चित्र आहे. प्रकल्पपूर्तीसाठी मुदतवाढ दिली जात आहे. दुसऱ्या टप्प्याचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. ते पूर्ण होण्यासाठी आणखी सहा महिन्यांचा कालावधी लागेल. त्यामुळे दुसरा टप्पा कार्यान्वित करण्यासाठी जून २०२५ चा मुहूर्त ठरला करणाऱ्या दुसऱ्या टप्प्याचे आतापर्यंत ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. वसई-विरार आणि मिरा-भाईंदरमधील पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी लावून या शहरांना मुबलक पाणीपुरवठा करण्यासाठी सुमारे १,३२५.७८ कोटी रुपये खर्चाचा सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्प 'एमएमआरडीए'ने हाती घेतला.

## क्षयरोग निर्मूलनसाठी मुंबईमध्ये राबविणार '१०० दिवस मोहीम', २६ प्रभागांमध्ये मोहीम सुरू होणार

■ **मुंबई : विशाल कारंडे**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत मुंबईतील २६ प्रभागांमध्ये ७ डिसेंबर २०२४ पासून २४ मार्च २०२५ पर्यंत '१०० दिवस मोहीम' राबवण्यात येणार आहे. क्षयरोग रुग्ण शोधण्याची गती वाढविणे, क्षयरोगाचा मृत्यू दर कमी करणे, क्षयरोगाचा प्रसार कमी करून नवीन क्षयरुग्ण टाळणे हे मोहिमेचे उद्दिष्ट असणार आहे.

भारत सरकारने २०२५ अखेर देशातून क्षयरोगाचे निर्मूलन करण्याचे ध्येय ठेवले. त्याअनुषंगाने केंद्रीय क्षयरोग विभागाच्या सूचनेनुसार संपूर्ण भारतात आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार मुंबईतील २६ प्रभागांमध्ये ७ डिसेंबर २०२४ पासून २४ मार्च २०२५ पर्यंत '१०० दिवस मोहीम' राबवण्यात येणार आहे. यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे सर्व प्रभागांच्या अधिकाऱ्यांचे दृकश्राव्य प्रणालीद्वारे संवेदीकरण करण्यात आले. यामध्ये २०० पेक्षा अधिक वैद्यकीय अधिकारी सहभागी झाले होता. सर्व संबंधित प्रभागांना मोहिमेबाबत सूचना करण्यात आल्या. तसेच संबंधितांना प्रभागस्तरावर प्रशिक्षण देण्यात आले आहे. ७ डिसेंबर २०२४ रोजी मार्गदर्शक सूचनेनुसार मोहिमेचा प्रभाग स्तरावर शुभारंभ करण्यात येणार आहे.

या मोहिमेदरम्यान विभागनिहाय अतिजोखमीच्या लोकसंख्येचे आणि क्षयरुग्णांचे मॅपिंग करण्यात येणार आहे, अतिजोखमीच्या व्यक्तींची नॅट व 'एक्स रे'च्या मदतीने क्षयरोगासाठी तपासणी करण्यात येईल. तसेच क्षयरोग निदान झालेल्या व्यक्तींवर त्वरित व योग्य उपचार करण्यात येणार आहेत. क्षयरोग निदान झालेल्या व्यक्तींना पोषणासाठी निक्षय



पोषण योजनेचा लाभ तसेच निक्षय मित्र बनवून पोषणासाठी सहाय्य देण्यात येईल. तसेच, क्षयरोग नसलेल्या परंतु क्षयरुग्णाच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींना क्षयरोग प्रतिबंधित उपचार देण्यात येणार आहेत. जनभागीदारीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन ७ डिसेंबर २०२४ ते २४ मार्च २०२५ या कालावधीत निक्षय शिबिर, विविध स्पर्धा आणि कार्यक्रमांद्वारे शाळा व महाविद्यालयांमधील युवकांचा सहभाग, निक्षय सप्ताहाचे आयोजन, निक्षय प्रतिज्ञेचे वाचन तसेच विविध उत्सवादरम्यान क्षयरोगाबद्दलची जनजागृती जिल्हा क्षयरोग अधिकारी यांच्या पथकाद्वारे करण्यात येणार आहे.

ही मोहिम 'जन भागीदारीतून' यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाव्यतिरिक्त, इतर विभाग, वैद्यकीय महाविद्यालये, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, खासगी उद्योग उपक्रम, नागरी संस्था, स्वयं-सहाय्य गट, सहकारी आणि इतर समुदाय स्तरावरील संघटना यांनी सक्रिय आणि सहयोगी सहभाग घेण्यासाठी आवाहन मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे.

## झोपु कायद्याच्या कठोर अंमलबजावणीत १०० हून अधिक समस्यांचा अडसर, उच्च न्यायालयात अहवाल

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

मुंबईतील झोपडपट्टी क्षेत्रे ओळखणे आणि घोषित करणे यातील गुंतागुंतीसह झोपडपट्टी पुनर्वसन कायद्याच्या (झोपु) अंमलबजावणीवर परिणाम करणाऱ्या १०० हून अधिक समस्यांवर प्रकाश टाकणारा अहवाल गुरुवारी उच्च न्यायालयात सादर करण्यात आला. त्याची दखल घेऊन मुंबईकरांना सतावणाऱ्या आणि मुंबईवर परिणाम करणाऱ्या मुख्य आणि ज्वलंत समस्यांवर प्रामुख्याने लक्ष देणे आवश्यक असून या समस्या सोडविण्यासाठी न्यायालय प्राधान्य देईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, मंजुरी आणि पुनर्विकास) कायद्याचा फेरआढावा घेण्यासाठी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाची स्थापना केली आहे. त्या पार्श्वभूमीवर, न्यायमूर्ती कुलकर्णी यांच्या



अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर या प्रकरणी गुरुवारी विशेष सुनावणी झाली. त्यावेळी, झोपु कायद्याच्या अंमलबजावणीवर परिणाम करणाऱ्या १०० हून अधिक समस्यांवर प्रकाश टाकणारा सविस्तर अहवाल न्यायालयाला या मुद्यावर सहकार्य करण्यासाठी नियुक्त केलेले वरिष्ठ वकील दरायस खंबाटा यांनी सादर केला. त्याची दखल घेऊन खंडपीठाने उपरोक्त बाब स्पष्ट केली. तर, यातील प्रशासकीय बाजूने हाताळल्या जाऊ शकणाऱ्या समस्यांचे निराकरण केले जाईल आणि आवश्यक तेथे कायद्यात बदलही केला जाईल, असे आश्वासन राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी न्यायालयाला दिले. झोपु कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी काही बदल आधीच करण्यात आल्याचेही त्यांनी न्यायालयाला सांगितले.

दरम्यान, मुंबईतील हरितपट्टा कमी होत चालल्याबाबत चिंता व्यक्त करून भावी पिढीला आपण काय देणार आहोत, असा प्रश्नही न्यायमूर्ती कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने यावेळी उपस्थित केला. तसेच, या प्रकरणी दूरगामी दृष्टीकोन बाळगण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले. भावी पिढ्यांचे आरोग्यदायी आणि उज्ज्वल भविष्य घडवण्यात मोकळ्या जागा आणि क्रीडा सुविधांची महत्त्वाची भूमिका असणार आहे. त्यामुळे, या जागांचे जतन करणे महत्त्वाचे असल्याचे खंडपीठाने अधोरेखित केले. भारतात २०३६ मध्ये ऑलिम्पिकचे आयोजन केले जाणार असल्याचे बोलले जात आहे. भारताने तसा प्रस्तावही सादर केला आहे याचा न्यायमूर्ती कुलकर्णी यांनी दाखला दिला. परंतु, खासगी पुनर्विकासासाठी मोकळ्या जागा दिल्या गेल्या तर तरुण खेळाडू कुठे खेळणार, त्यांना कुठे प्रशिक्षण दिले जाईल, अशा स्थितीत तरूण खेळाडुंच्या प्रतिभेचे काय, असे प्रश्न न्यायालयाने उपस्थित केले.

## कोकण रेल्वेमार्गावरून अहमदाबाद-थिवि विशेष रेल्वेगाडी

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

लग्नसराई, नाताळ आणि नववर्षाच्या निमित्त्याने अनेकजण कोकणात फिरायला जातात. या प्रवाशांच्या सोयीसाठी कोकण रेल्वे मार्गावरून विशेष अहमदाबाद-थिवि रेल्वेगाडी चालविण्यात येणार आहे. नाताळ, नववर्ष साजरा करण्यासाठी गोवा आणि कोकण हे अनेकांचे आवडते स्थळ आहे. या काळात नियमित रेल्वेगाड्यांची प्रतीक्षा यादी प्रचंड वाढते. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास सोयीस्कररित्या व्हावा, यासाठी विशेष रेल्वेगाडी चालवण्यात येणार आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी कोकण रेल्वेने अहमदाबाद-थिवि द्वि-साप्ताहिक रेल्वेगाडी चालवणार



आहे. ही विशेष रेल्वेगाडी ८ डिसेंबर ते १ जानेवारी २०२५ या कालावधीत चालवली जाईल. प्रत्येक रविवार आणि बुधवारी दुपारी २.१० वाजता अहमदाबाद स्थानकातून सुटेल. ती दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता थिवि स्थानकावर पोहोचेल. तर, थिवि-अहमदाबाद ही विशेष रेल्वेगाडी ९ डिसेंबर ते २ जानेवारी २०२५ या कालावधीत प्रत्येक सोमवार आणि गुरुवारी चालवली जाईल. ही रेल्वेगाडी सकाळी ११.४० वाजता थिवि स्थानकातून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ८.४५ वाजता अहमदाबाद स्थानकावर पोहोचेल.

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.**
**निविदा सूचना क्रमांक १९ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत मजूर सहकारी संस्था ( फक्त मुंबई उपनगर जिल्हा (पश्चिम) करीता) कुशल अ-वर्ग कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता ब -१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नांव | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १. | मुळ गौण कामे अंतर्गत न्यूझीलंड हॉस्टेल, आरे वसाहत, गोरेगाव (पु) मुंबई-६५ या इमारतीतील स्वयंपाक गृह, भोजन कक्ष व संलग्न शौचालयचे मजबुतीकरण व नूतनीकरण करणे. | रु.२४८९७६९.०० |
| २. | मुळ गौण कामे अंतर्गत न्यूझीलंड हॉस्टेल, आरे वसाहत, गोरेगाव (पु) मुंबई-६५ या इमारतीच्या छतावर जल प्रतिबंधक प्रक्रिया करणे. | रु.२४२३६५९.०० |
| ३. | मुळ गौण कामे अंतर्गत न्यूझीलंड हॉस्टेल, आरे वसाहत, गोरेगाव (पु) मुंबई-६५ या इमारतीतील शौचालयाची (तळ मजला व पहिला मजला उजवी बाजू (२ नंबर) दुरूस्ती व नूतनीकरण करणे. | रु.२११३१२९.०० |
| ४. | मुळ गौण कामे अंतर्गत सार्वजनिक आरोग्य केंद्र, आरे गोरेगाव (पु) या इमारतीत संरचनात्मक दुरूस्ती, अंतर्गत/ बाह्य गिलावा व रंगकाम कामे करणे. | रु.२४९०४१४.०० |
| ५. | मुळ गौण कामे अंतर्गत सार्वजनिक आरोग्य केंद्र, आरे गोरेगाव (पु) या इमारतीत पाणी पुरवठा पाइपलाइन व ड्रेनेज प्रणालीचे काम करणे. | रु.२१२३८२४.०० |
| ६. | मुळ गौण कामे अंतर्गत सार्वजनिक आरोग्य केंद्र, आरे गोरेगाव (पु) या इमारतीत दरवाजे, खिडक्या व संरक्षक लोखंडी जाळी पुरवणे. | रु.२४९०८२४.०० |
| ७. | मुळ गौण कामे अंतर्गत सार्वजनिक आरोग्य केंद्र, आरे गोरेगाव (पु) या इमारतीत शौचालयचे काम करणे. | रु.२३२८८४४.०० |
| ८. | मुळ गौण कामे अंतर्गत सार्वजनिक आरोग्य केंद्र, आरे गोरेगाव (पु) या इमारतीच्या छतावर जल प्रतिबंधक प्रक्रिया करणे. | रु.१३८८३३४.०० |
| ९. | प्रशासकीय इमारत आरे, गोरेगाव (पु) या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील शौचालयाची पुनर्रचना करणे. | रु.१६१५५०६.०० |
| १०. | प्रशासकीय इमारत आरे, गोरेगाव (पु) या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील शौचालयाची पुनर्रचना करणे. | रु.१२११७२१.०० |
| ११. | कृ. बा. उप. वि.-१३, आरे, गोरेगाव येथील प्रसाधन गृहाची दुरुस्ती करणे. (आतील गिलावा व रंगकाम करणे, लादी बसविणे, F.R.P दरवाजे व खिडक्या बसविणे, शौच कूप बसविणे व इतर स्थापत्य कामे करणे.) | रु.१५७८१९२.०० |
| १२. | मुळ गौण कामे अंतर्गत सार्वजनिक आरोग्य केंद्र, आरे गोरेगाव(पु), या इमारतीत फरशीचे काम करणे. | रू.३२०१८.२४.०० |

**ई - निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक ०६/१२/२०२४ @ १५:०० पासून दिनांक २०/१२/२०२४ @ १७:०० पर्यंत. |
| २ | निविदा सादर करण्याचा कालावधी | दिनांक ०६/१२/२०२४ @ १५:०० पासून दिनांक २०/१२/२०२४ @ १७:०० पर्यंत. |
| ३ | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक २३/१२/२०२४ सकाळी ११.३० वाजता (शक्य झाल्यास) कार्यकारी अभियंता, स.बां.विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगाव ,मुंबई-४०००६५ यांचे कार्यालय |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

जा. क्रं. साबांविप्र-आरे/नि.लि./२०३०
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७
दिनांक:- 2 DEC 2024

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४९२९

# वसई विरार मॅरेथॉन २०२४ स्पर्धेत साताऱ्याचा कालिदास हिरवे विजेता

**■ वसई : सुचिता देशमुख**

रविवारी पार पडलेली १२ वी वसई विरार मॅरेथॉन स्पर्धा साताऱ्याचा कालिदास हिरवे याने जिंकली. २ तास १८ मिनिटे १९ सेकंदात ४२ किमीची धाव पूर्ण करीत त्याने विजेतेपद पटकावले. २१ किमीच्या अर्ध मॅरेथॉन महिला गटात सोनिका परमार व पुरुष गटातून रोहित वर्मा यांनी बाजी मारली आहे. १६ हजाराहून अधिक स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. वसई विरार महापालिकेची १२ वी राष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा रविवारी मोठ्या उत्साहात पार पडली. सकाळी साडेपाच वाजता या स्पर्धेला सुरुवात झाली होती. या स्पर्धेत देशभरातील विविध ठिकाणचे हजारो धावपटू यात सहभागी होऊन ५ किमी, १० किमी, २१ किमी, ४२ किमी अंतर पूर्ण केले. मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांचा उत्साह वाढविण्यासाठी विविध ठिकाणच्या मार्गावर प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती. यामुळे धावणाऱ्या स्पर्धकांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. यात लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व महिला वर्ग सहभागी होत त्यांनीही सामाजिक संदेश दिले. ४२ किमीच्या पूर्ण मॅरेथॉनमध्ये साताराचा धावपटू कालिदास हिरवे ठरला सुवर्णपदक विजेता, तर प्रदीपसिंग चौधरी द्वितीय क्रमांक पटकावत रौप्य आणि मोहित राठोड कांस्य पदक विजेते ठरले. तर महिलांच्या २१ किमी अर्ध मॅरेथॉन स्पर्धेमधे हरियाणाची सोनिका परमार प्रथम, भारती नैन द्वितीय आणि साक्षी जड्याल तृतीय क्रमांक पटकावला.



तर पुरुष गटातून रोहित वर्मा याने प्रथक तर नितीशकुमार रथवा द्वितीय व दीपक कुंभार याने तृतीय क्रमांक पटकावला. या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व मेडल देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेसाठी मॅरेथॉन सदिच्छादूत (इव्हेंट ॲम्बेसेडर) म्हणून ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा सुवर्णपदक विजेती साक्षी मलिक उपस्थित होती. तसेच स्पर्धेसाठी पालघरचे खासदार डॉ हेमंत सवरा, नालासोपारा विधानसभेचे आमदार राजन नाईक, वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित, माजी आमदार हितेंद्र ठाकूर, क्षितीज ठाकूर, माजी महापौर राजीव पाटील, माजी खासदार बळीराम जाधव, शिवसेना ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका किरण चेंदवणकर, विनायक निकम, भाजपचे जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, मनोज पाटील, पालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे, संजय हेरवाडे यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

**मॅरेथॉन स्पर्धेचा निकाल**

४२ किलोमीटर पूर्ण मॅरेथॉन स्पर्धा

१. कालिदास हिरवे – २ तास १८ मिनिटे १९ सेकंद

२. प्रदीप चौधरी – २ तास १८ मिनिटे २४ सेकंद

३. मोहित राठोड – २ तास १९ मिनिटे ६ सेकंद

अर्ध मॅरेथॉन स्पर्धा (महिला)

१. सोनिया परमार– १ तास १३ मिनिटे १२ सेकंद

२. भारती नैन – १ तास १३ मिनिटे ५१ सेकंद

३. साक्षी जड्याल- १ तास १४ मिनिटे २१ सेकंद

अर्ध मॅरेथॉन (पुरुष)

१. रोहित वर्मा – १ तास ३ मिनिटे १२ सेकंद

२. नितीशकुमार रथवा – १ तास ३ मिनिटे १३ सेकंद

३. दीपक कुंभार- १ तास ३ मिनिटे सेकंद

# पालिकेचे एकमेव निर्बीजीकरण केंद्र बंद, पालिकेकडून दुरुस्तीचे काम; नवीन निर्बिजीकरण केंद्र ही रखडले

**■ वसई : प्रतिनिधी**

वसई विरार शहरात दिवसागणिक भटक्या श्वानांचा उपद्रव वाढू लागला आहे. या भटक्या श्वानांचा नियंत्रणात आणण्यासाठी नवघर येथे पालिकेचे एकमेव निर्बीजीकरण केंद्र आहे. मात्र दुरूस्तीच्या कामामुळे मागील काही दिवसांपासून हे केंद्र बंद आहे. वसई विरार शहरात भटक्या श्वानांची संख्या वाढू लागली आहे. सैरावैरा फिरणारे भटके श्वान नागरिक व लहान मुले यांच्यावर हल्ला चढवत असल्याच्या घटना समोर येत असतात. तर कधी कधी नागरिकांच्या अंगावर धावून जाण्याचे प्रकार घडतात. यासाठी या श्वानांना आवर घालावा अशी मागणी सातत्याने नागरिकांमधून केली जात आहे. सध्या स्थितीत पालिकेचे नवघर पूर्वेच्या भागात एकमेव श्वान निर्बीजीकरण केंद्र आहे. त्याची क्षमता केवळ १६५ इतकी आहे. या केंद्रात श्वानांचे निर्बीजीकरण केले जाते. मात्र



मागील काही दिवसांपासून हे केंद्र बंद अवस्थेत आहे. त्यामुळे श्वानांच्या निर्बिजीकरणाची प्रक्रिया ठप्प झाली आहे. या केंद्रातील श्वान ठेवण्याचे पिंजरे व फरशी तुटली आहे. त्याच्या दुरुस्तीच्या कामामुळे हे केंद्र काही दिवस बंद ठेवण्यात आले असल्याचे पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

नवघर पूर्वेच्या भागात पालिकेचे एकमेव निर्बीजीकरण केंद्र आहे. त्यात १६५ इतकेच श्वानांवर उपचार केले जाऊ शकतात. वाढत्या श्वानांच्या उपद्रवामुळे ते ही अपुरे पडू लागले आहे. यासाठी पालिकेने नवीन निर्बीजीकरण केंद्रासाठी चंदनसार व नालासोपारा येथील निर्मळ येथे निश्चित केले होते. मात्र विविध प्रकारच्या अडचणीमुळे ते ही काम रखडले. याशिवाय त्यानंतर खाली इमारती ताब्यात घेऊन त्या ठिकाणी उपचार सुरू करू असे ठरविले होते त्यावरही तोडगा निघाला नसल्याने समस्या जटिल बनू लागली आहे.

# निवडणुकीनंतर कामांना गती, नागरी सुविधा कामांच्या निविदांसाठी नवी मुंबई महापालिकेची तांत्रिक समिती

**■ नवी मुंबई : धनश्री सट्टा**

**राज्यातील विधानसभा निवडणुकीची लगबग संपून नवे सरकार सत्तेत आले आहे. निवडणूक आचारसंहितेमुळे अनेक कामे पालिका स्तरावर खोळंबून होती. आता निवडणुकीनंतर या नागरी सुविधा कामांना गती मिळणार आहे. नवी मुंबई महापालिकेत कोट्यवधी रुपये किमतीची अनेक कामे पालिकेमार्फत केली जातात. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली जात असून त्यामुळे निविदा प्रक्रियांच्या कामकाजात येणार सुसूत्रता व गतिमानता येणार आहे. पालिकेने निविदांसाठी एक तांत्रिक समिती स्थापन केली आहे.**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात रस्ते, पदपथ, गटारे, इमारती, नाले तसेच पाणी पुरवठा, मलनि:स्सारण, विद्युत अशी विविध प्रकारची नागरी सुविधा कामे करतांना अर्थसंकल्पातील संबधित लेखाशीर्षातर्गत तरतूदी अन्वये



तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर निविदा काढण्यात येतात. या निविदा प्रक्रियेत सुनियोजितपणा व गतीमानता येण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी या क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ निवृत्त शासकीय अधिकाऱ्यांची निविदा शर्ती, पूर्व अहर्ताबाबत तांत्रिक समिती स्थापन केली आहे. त्यामुळे पालिकेच्या विविध कामांसाठीच्या निविदा प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रात विविध विभागात कामांसाठी व नागरी सोयीसुविधांसाठी प्रस्तावित कामांच्या निविदा काढतांना त्यामध्ये कामाच्या स्वरुपानुसार काही बदल करण्यात येतात. या निविदा सादर करतांना प्रमाण निविदा बनवून निविदेत सारखेपणा येण्यासाठी प्रत्येक कामाची निविदा अद्ययावत शासन निर्णयाप्रमाणे शहर अभियंता यांच्या मंजूरीनंतर वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी पाठविण्यात येतात. निविदेच्या कार्यालयीन प्रक्रियेत अधिक सुसूत्रता व पारदर्शकता येण्यासाठी आणि कामाचा वेग वाढवून जलद निपटारा होण्याच्या दृष्टीने तसेच अर्थसंकल्पात नमूद कामे त्याच अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार पूर्ण होण्यासाठी कार्यनियोजन करण्यात आले आहे. त्यास अनुसरून प्रस्तावित कामांचे अंदाजपत्रक व पूर्ण झालेल्या निविदांच्या सर्व नस्ती संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत तपासून व छाननी करुन कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्याकडे निविदा मंजूरीसाठी सादर करावयाच्या आहेत. या कामामध्ये सूसुत्रता येण्याकरिता व निविदाविषयक कागदपत्रे अद्ययावत करण्याकरिता निविदा शर्ती, पूर्व अहर्ता बाबतची तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये निवृत्त सचिव अथवा शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि समकक्ष मुख्य अभियंता या समितीचे अध्यक्ष असणार आहेत.

# कळंबोली सर्कलला कोंडीचा फेरा, मुंब्रा, पनवेल उड्डाणपूल अवजड वाहनांसाठी प्रतीक्षापूल

**■ पनवेल : सचिन कदम**

कळंबोली सर्कल येथील मुंब्रा पनवेल महामार्गावर बांधलेला उड्डाणपुल हा सध्या अवजड वाहनांसाठी प्रतीक्षापूल बनला आहे. कळंबोली सर्कलवरील वाहतूक कोंडीचा प्रश्न वाहतूक पोलीस सोडवू न शकत असल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे. या सर्कलवर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी सात ते आठ पोलीस कर्मचारी आणि वाहतूक वार्डन पोलीसांच्या मदतीला असतानाही वाहनचालकांना कळंबोली सर्कलवर मोठ्या प्रमाणात कोंडीचा सामना करावा लागत आहे. एकाच सर्कलवर १६ विविध रस्ते आपसात जोडले गेल्याने ही कोंडी होत असली तरी वाहतूक पोलीसांनी रस्त्यावर दंडात्मक कारवाई करण्यासोबत वाहतूक नियमन करण्याची मागणी वाहनचालकांकडून जोर धरत आहे.

कळंबोली सर्कलचा विस्तार पुढील काही वर्षात होईल. यासाठी सरकार पाचशे कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम खर्च करणार आहे. अडीच ते तीन वर्षे या कामासाठी लागणार असले तरी कळंबोली सर्कलवर सध्या मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीमुळे मुंब्रा बाजूकडून जेएनपीटी बंदर, मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई गोवा या महामार्गाकडे जाणाऱ्या वाहनांना कळंबोली गावासमोर बांधलेल्या उड्डाणपुलावर अनेक मिनिटांची प्रतीक्षा करावी लागत आहे. कळंबोली सर्कलप्रमाणे रोडपाली सिग्नल आणि



नावडे गावासमोरील उड्डाणपुलाखाली वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होते. दोन दिवसांपूर्वी ही कोंडी फोडण्यासाठी वाहतूक पोलीसांनी रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. मात्र यापूर्वीही अनेक चर्चा आणि प्रस्ताव पोलिसांकडून देऊनही वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटलेला नाही. कामोठे येथील पथकर नाका (टोलनाका) खारघर येथे स्थलांतरित केल्यास नवी मुंबई आणि मुंबईच्या दिशेने पुण्याकडे जाण्यासाठी कामोठे टोलनाका चुकविणाऱ्या अवजड वाहनांना थेट कळंबोली येथून द्रुतगती महामार्गावर जावे लागेल त्यामुळे रोडपाली सिग्नलवरील ताण कमी होईल असा जुनाच प्रस्ताव पुन्हा वाहतूक पोलिसांनी रस्ते विकास महामंडळासमोर मांडला. मात्र टोलनाका स्थलांतर करणे म्हणजे पुन्हा सरकारमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी आणण्याचा नवा पेच या प्रस्तावासमोर उभा राहिला आहे. मुंब्रा पनवेल महामार्गावर नावडे गाव ते रोडपाली सिग्नल आणि रोडपाली सिग्नल ते कळंबोली सर्कल या मार्गिकेवर १२ फुटी रस्त्याचे रुंदीकरण तातडीने करणे गरजेचे आहे. त्यावर सुद्धा या बैठकीत चर्चा झाली. वरिष्ठांकडे प्रस्ताव पाठवितो त्या प्रस्तावाला मंजूरी मिळाल्यानंतर निविदा आणि त्यानंतर प्रत्यक्ष काम या सर्व प्रक्रियेत हा रुंदीकरणाचा प्रस्ताव अडकण्याची चिन्हे आहेत.

# करंजा रेवस सागरी पूल मार्गिकिला ग्रामस्थांचा आक्षेप, १९८० च्या नियोजन आराखड्यानुसार जोड मार्गिका देण्याची मागणी

**■ उरण : सतिश सोनावणे**

करंजा (उरण) ते रेवस (अलिबाग) या बहुप्रतीक्षित सागरी पुलाच्या जोड मार्गिकेला करंजा ग्रामस्थांनी आक्षेप नोंदविला आहे. गुरुवारी एमएसआरडी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांसमोर ग्रामस्थांनी आपल्या हरकती नोंदविल्या आहेत. यावेळी ग्रामस्थांनी तत्कालीन मुख्यमंत्री अ. र. अंतुले यांच्या १९८० च्या आराखड्यानुसार मार्गिका प्रणालीद्वारे करण्यात आले आहे. २ हजार ४७८ कोटी रुपयांची निविदा या पुलाच्या उभारणीसाठी मागविण्यात आली आहे. या पुलाची एकूण लांबी ही १०.२०९ किलोमीटर आहे. मुंबईतील सागरी अटल सेतू मार्गे द्रोणागिरी नोड येथून या पुलावरून कोकणात हा प्रवास करता येणार आहे. नियोजित रेड्डी ते रेवस मार्गापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या वतीने १९८०




द्यावी अशी मागणी केली आहे. यासाठी प्रशासनाला निवेदनही देण्यात आले आहे.

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ(एमएसआरडीसी) च्या माध्यमातून नव्याने हा मार्ग उभारण्यात येत आहे. प्रस्तावित रेवस ते रेड्डी या मुंबईला थेट कोकणाशी जोडणाऱ्या या महत्त्वाकांक्षी सागरी महामार्गाच्या जोड मार्गिकेला करंजा ग्रामस्थांनी आक्षेप नोंदविला आहे. याची दखल घेत एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळाला भेट देऊन शेतकरी आणि ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेतले. उरणच्या करंजा ते अलिबाग येथील रेवस दरम्यानच्या दोन किलोमीटर लांबीच्या पुलाचे भूमिपूजन १४ ऑक्टोबरला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य साली महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री अ.र अंतुले यांनी करंजा ते रेवस मार्गाची घोषणा केली होती. यावेळी भूसंपादनाची प्रकिया राबवून प्रत्यक्षात कामाला सुरुवात सुद्धा करण्यात आली होती. परंतु काही कारणास्तव सत्ताबदल होऊन अंतुले यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागल्याने या पुलाचे काम बंद झाले होते.

४२ वर्षानंतर पुन्हा एकदा नव्याने सरकारने एमएसआरडीसीकडून हा मार्ग तयार केला जात आहे. त्यासाठी या मार्गावर करंजा ते रेवस हा सागरी पूल उभारला जाणार आहे. या पुलाला जोडणाऱ्या मार्गासाठी करंजा येथील चाणजे महसूल हद्दीतील जमीन संपादित करण्यात येणार आहे.

# डोंबिवलीतील ५८ बेकायदा इमारती रिकाम्या करण्याच्या नोटिसा, दहा दिवसांत इमारती जमीनदोस्त करण्याचे आदेश

**■ कल्याण : आकाश कांबळे**

डोंबिवलीत बेकायदा इमारती उभारून या इमारतींना महारेराचा नोंदणी क्रमांक मिळवून, या बेकायदा इमारती अधिकृत असल्याचे दाखवून घर खरेदीदारांची फसवणूक करणाऱ्या डोंबिवलीतील ह, ग, फ, ई आणि आय प्रभागातील बेकायदा ५८ इमारतींमधील रहिवाशांना इमारती रिकाम्या करण्याच्या, त्या जमीनदोस्त करण्याच्या नोटिसा साहाय्यक आयुक्तांनी देण्यास सुरुवात केली आहे. या नोटिसांमुळे या बेकायदा इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांमध्ये खळबळ उडाली आहे. डोंबिवलीतील ६५ बेकायदा इमारती तीन महिन्यांच्या आत जमीनदोस्त करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमोल बोरकर यांनी दिले आहेत. ६५ बेकायदा इमारतींच्या विकासकांनी महारेराचा नोंदणी क्रमांक मिळवून



या इमारती अधिकृत असल्याचे दाखवून या इमारतींमधील घरे रहिवाशांना विकली आहेत. अशाप्रकारचे यापुढे होणारे प्रकार रोखण्यासाठी वास्तुविशारद संदीप पाटील यांनी या बेकायदा इमारतींवर कारवाई करण्यासाठी चार वर्षांपासून पालिकेकडे तगादा लावला होता. पालिकेकडून कारवाई होत नसल्याने वास्तुविशारद पाटील यांनी याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. याचिका दाखल होताच पालिकेने ६५ इमारतीच्या विकासकांविरुद्ध मानपाडा, रामनगर पोलीस ठाण्यात तीन वर्षांपूर्वी गुन्हे दाखल केले. न्यायालयाने या याचिकेची दखल घेऊन येत्या तीन महिन्यांत या बेकायदा इमारती तोडण्याचे आदेश कल्याण डोंबिवली पालिकेला दिले आहेत. न्यायालयात याचिका दाखल झाल्यानंतर दरम्यानच्या काळात पालिकेने ६५ बेकायदा इमारतींमधील सात इमारती तोडल्या आहेत.

# डोंबिवलीत पालिकेचे पाटकर प्लाझा वाहनतळ सांडपाण्याने तुंबले

**■ डोंबिवली : भावना जैन**

येथील पूर्व रेल्वे स्थानक भागातील बाजीप्रभू चौकातील पाटकर प्लाझामधील पालिकेचे तळघरातील रिकामे वाहनतळ गेल्या काही दिवसांपासून सांडपाण्याने तुंबले आहे. या तुंबलेल्या पाण्याला दुर्गंधी आणि त्यावर डास निर्माण झाल्याने या भागात व्यवसाय करणारे व्यापारी त्रस्त आहेत. याप्रकरणी आम्ही पालिकेला पत्र दिली आहेत, असे येथील व्यापाऱ्यांनी सांगितले.

कल्याण डोंबिवली पालिकेची बाजीप्रभू चौकातील पाटकर प्लाझामध्ये तळघरात वाहनतळाची जागा आहे. तळ आणि पहिला मजला अशा व्दिस्तरीय वाहनतळाची येथे व्यवस्था आहे. ही वाहनतळे सुरू करण्यात यावीत म्हणून मागील सहा वर्षापासून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, वाहतूक अधिकारी, रिक्षा संघटना प्रयत्नशील आहेत. यापूर्वी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण



यांनी पुढाकार घेऊन हे वाहनतळ सुरू करण्याचा प्रयत्न केला होता. इतर राजकीय अडथळ्यांमुळे हा विषय नंतर मागे पडला. पाटकर प्लाझा मधील तळघरातील रिकाम्या वाहनतळाच्या जागेत गेल्या काही दिवसांपासून दोन ते तीन फूट सांडपाणी तुंबले आहे. हे तुंबलेले पाणी वाहून जाण्यास मार्गिका नाही. अनेक दिवसांच्या या तुंबलेल्या सांडपाण्यामुळे या भागात दुर्गंधी पसरली आहे. त्यावर डास तयार झाले आहेत. चिमणी गल्ली, पाटकर प्लाझामध्ये व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्याचा त्रास होत आहे. रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या प्रवाशांनाही त्याचा त्रास होतो.

या वाहनतळाच्या तळघरातील सांडपाणी काढून हे वाहनतळ पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नागरिक, व्यापाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# आसनगाव-कसारा लोकल फेऱ्यांमध्ये एक्सप्रेसचा अडथळा, लोकल गाड्या उशिरा धावत असल्यामुळे प्रवाशांमधून नाराजी

**■ शहापूर : प्रतिनिधी**

आसनगाव ते कसारा मार्गावर लोकल फेऱ्यांमध्ये वाढ होत नसल्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी पसरलेली असतानाच, त्यात आता सुरु असलेल्या लोकल फेऱ्यांच्या वेळापत्रकात वंदेभारत आणि इतर एक्स्प्रेस गाड्या सोडल्या जात आहेत. त्यामुळे लोकल गाड्या उशिराने धावत आहेत. तर, जलद लोकल गाड्याही धिम्या मार्गावरुन चालवल्या जात असल्याने नोकरदार वर्गाला कामाला पोहोचण्यास दररोज उशीर होत आहे. रेल्वे प्रशासनाच्या या भोंगळ कारभाराविरोधात प्रवाशांचा रोष वाढत असून, संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

गेल्या अनेक वर्षापासून आसनगाव आणि कसारा लोकल फेऱ्यांमध्ये वाढ करणार नसल्यामुळे मध्यरेल्वे प्रशासनाने यंदाही आसनगाव – कसाऱ्याला सापत्न वागणूक देऊन प्रवाशांच्या संतापात भर घातली आहे. नुकत्याच प्रसिद्ध करण्यात आलेल्या वेळापत्रकात आसनगाव आणि कसाऱ्याकडे जाणाऱ्या लोकल फेऱ्यांमध्ये देखील वाढ करण्यात आली नसल्याने मध्य रेल्वे प्रशासनाविरोधात प्रवाशांमध्ये कमालीचा असंतोष पसरला आहे. पीक अवर्समध्ये प्रवाशांना अक्षरशः दरवाजाला लटकत जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. लोकलमधून पडल्याने मृत्यू झाल्याच्या अनेक घटना समोर असतानाही निर्ढावलेले रेल्वे प्रशासन मात्र, हातावर हात धरून बसले असून टिटवाळा ते कसारादरम्यान स्थानकांवर प्रवाशांना



भेडसावणाऱ्या अनेक समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत आहे. गेली कित्येक वर्ष कसारा – आसनगाव भागात एकही नवीन लोकल वाढविण्यात आली नसून कसारा आणि आसनगाव येथे अप आणि डाऊन लोकल थांबवून वंदेभारत सह अन्य मेल, एक्सप्रेस पुढे काढून लोकल २० मिनिटांहून अधिक उशिरा केल्या जातात याकडे रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. यांसह, आसनगाव स्थानकात अर्धवट स्थितीत असलेला होम प्लॅटफॉर्मचे तत्काळ काम सुरू करणे, कसारा दिशेकडील २०१८ ला तोडलेला अतिमहत्वाचा पादचारी पूल बांधणे, पूर्व-पश्चिम वाहतुकीचा उड्डाणपूल मंजूर करणे, आटगाव स्थानकात जुन्या पडक्या पादचारी पुलावरील तिकीट ऑफिसचे प्रवाशांच्या सोयीनुसार व्यवस्थापन करणे, खडावली स्थानकात आसनगाव दिशेला पादचारी पुलाची उपाययोजना करणे, कसाराहून मुंबई कडे जाणाऱ्या पहाटेच्या पहिल्या दोन लोकल दरम्यान एक नवीन लोकल वाढविणे, कसाराहून सुटणाऱ्या पहाटेच्या सर्व लोकल जलद करणे, खर्डी स्थानकाजवळ पूर्व पश्चिम वाहतुकीचा उड्डाणपूल मंजूर करणे, टिटवाळा ते कसारा स्थानकांत मूलभूत सुविधा मुबलक प्रमाणात उपलब्ध करणे, स्थानकांच्या दोन्ही बाजूस महिलांसाठी स्वच्छ शौचालय करणे.

# गाळप करणाऱ्या कारखान्यांची संख्या घटली; यंदाच्या हंगामातील सद्यस्थिती



■ मुंबई : राकेश गायकवाड

राज्यात डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ७३ सहकारी आणि ७० खासगी, अशा जेमतेम १४३ कारखान्यांनी गाळप हंगाम सुरू केला आहे. गतवर्षी एकूण २०७ कारखान्यांनी गाळप केले होते. गतवर्षीच्या तुलनेत यंदा कमी कारखाने सुरू झाले आहेत. साखर आयुक्तालयातून देण्यात आलेल्या माहितीनुसार, यंदा राज्यातील २०७ कारखान्यांनी गाळप परवान्यांसाठी अर्ज केले होते. पहिल्या टप्प्यात १७९ कारखान्यांना गाळप परवाने देण्यात आले होते. त्यानंतर आणखी सात, अशा १८६ कारखान्यांना परवाने दिले आहेत. पाच कारखान्यांचे प्रस्ताव प्रादेशिक स्तरावर अडकले आहेत. त्यामुळे साखर आयुक्तालयाकडून एकूण १८६ कारखान्यांना गाळपासाठी परवाने दिले असले तरीही पाच डिसेंबरअखेर १४३ कारखान्यांची गाळप सुरू केले आहे. मागील वर्षी १०३ सहकारी, १०४ खासगी, अशा २०७ कारखान्यांनी गाळप सुरू केले होते. साखर आयुक्तालयाने परवाने देऊन गाळप करणाऱ्या कारखान्यांची संख्या वाढलेली दिसत नाही. राज्यातील १४३ कारखान्यांनी पाच डिसेंबरअखेर १०५.४७ लाख टन उसाचे गाळप करून सरासरी ७.६४ टक्के साखर उताऱ्याने साडेआठ लाख टन साखर उत्पादन घेतले आहे.

## महाराष्ट्र शासन

### कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,

**प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**

E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

### निविदा सुचना क्र. ३८ सन २०२३-२०२४

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, दादाभाई मार्ग, भवन्स कॉलेज जवळ अंधेरी (प) मुंबई-४०००५८ (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत **मुंबई जिल्हयातील व मुंबई उपनगर जिल्हायातील सुशिक्षित बेरोजगार अभियंता** खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र दिनांक- **०४/१२/२०२४** ते दिनांक- **१८/१२/२०२४** कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांचे कार्यालयात उपलब्ध असतील. तसेच दिनांक- **१९/१२/२०२४** दुपारी १७.०० वाजेपर्यत निविदा स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दीवशी निविदा उघडण्यात येतील निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत इंद्रप्रस्थ वसतीगृह (२१० ट्रेनिंग सेंटर) मरोळ पोलीस वसाहत अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ८४३६७८/- |
| २ | मानखुर्द, चिल्ड्रेन एड सोसायटी, बॅरेक क्र. १०/६५ येथे चेकर्ड टाईल्स बसविणे. | रु.८१३६४३/- |
| ३ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत इंद्रायणी वसतीगृह (२१० ट्रेनिंग सेंटर) मरोळ पोलीस वसाहत अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ८३९५८३/- |
| ४ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत पोलीस प्रशिक्षण केंद्र बॅरेक क्र.१ ते १८ मरोळ पोलीस वसाहत अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ८४२८७९/- |
| ५ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत पोलीस प्रशिक्षण मेस बॅरेक क्र.२ प्रसाधनगृह पॅसेज लेडिज विश्राम गृह आर.पी.आय. ऑफिस मरोळ पोलीस वसाहत अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ८४२८२६/- |
| ६ | मानखुर्द, चिल्ड्रेन एड सोसायटी, बॅरेक क्र. १०/६५ येथे पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन करणे. | रु.८०९८१६/- |
| ७ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत स्टोर शेड, शाळा बॅरेक क्र.१,२,३ व पंपरुम पाण्याची टाकी क्र.१ व २ प्रसाधनगृह, ल विभागाच्या बॅरेक क्र.१,२,३ व ७,८,९, सा.बां.चौकी मरोळ पोलीस वसाहत अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ८४३६३६/- |
| ८ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत प्रशासकीय इमारत, अंधेरी. मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.८४३२००/- |
| ९ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत तहसिलदार कार्यालय, तहसिलदार, संजय गांधी निराधार योजना कार्यालय, अंधेरी (प), एक्साईज कार्यालय, ओशीवरा पोलीस स्टेशन, अंधेरी मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ३४६५००/- |
| १० | मानखुर्द, चिल्ड्रेन एड सोसायटी, बॅरेक क्र. १०/६५ येथे फॉल्स सिलिंग करणे. | रु.८१००१५/- |
| ११ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत शासकीय तंत्रविद्यालय, राज्य कामगार बिमा योजना रुग्णालय, विलेपार्ले (प), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ४०३८०३/- |
| १२ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत नंदगिरी राज्य अतिथीगृह, विलेपार्ले (पू), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ४९८५८०/- |
| १३ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत र. वा. तंत्रविद्यालय खार (प), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ६३९७०१/- |
| १४ | मानखुर्द, चिल्ड्रेन एड सोसायटी, बॅरेक क्र. १०/६५ येथे ड्रेनेज लाईन बांधणे. | रु.८३७५००/- |
| १५ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत जुहू पोलीस ठाणे, अंधेरी (प), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम. प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. १३५९५०/- |
| १६ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत सांताक्रुझ पोलीस ठाणे, सांताक्रुझ पोलीस ठाणे येथील अटक कोठडी, सांताक्रुझ पोलीस ठाणे, सांताक्रुझ (प), मुंबई येथील राज्य राखीव पोलीस दलाची बॅरेक्स सांताक्रुझ (प), मुंबई.येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ४३०७८९/- |
| १७ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत शिधावाटप कार्यालय बान्द्रा , वांद्रे पोलीस ठाणे, हिल रोड, वांद्रे (प), मुंबई येथील अटक कोठडी, वांद्रे पोलीस ठाणे, पोलीस उपायुक्त परिमंडळ ९ यांचे हिल रोड वांद्रे (प), मुंबई येथील कार्यालय येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. २४९२८०/- |
| १८ | मानखुर्द, चिल्ड्रेन एड सोसायटी, बॅरेक क्र. १०/६५ येथील मैदानाचे व आवारातील गवत काढणे व साफसफाई करणे. | रु.८३७६००/- |
| १९ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ईस्माईल युसुफ महाविद्यालय जोगेश्वरी पुर्व मुंबई येथील मेन बॅरेक्स, शिक्षण निरीक्षण कार्यालय, पंप रुम, जिमनॉशियम रुम, आरमार भंडार येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ४०८७५०/- |
| २० | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ईस्माईल युसुफ महाविद्यालय जोगेश्वरी पुर्व मुंबई येथील प्राचार्य बंगला, सर्व्हेट क्वाटर्स १, २ व ३ , .एन.सी.सी स्टाफ क्वाटर्स येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ३८३७५०/- |
| २१ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ईस्माईल युसुफ महाविद्यालय जोगेश्वरी पुर्व मुंबई येथील नविन विज्ञान इमारत येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ३३७८००/- |
| २२ | चेंबूर येथील वायरलेस ऑफीस पूर्व नियंत्रण कक्ष येथे प्लास्टर आणि पेंटिंग, खिडक्या ग्रिल आणि फ्लोअरिंगची दुरुस्ती करणे. | रु. ४८७०८०/- |
| २३ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ईस्माईल युसुफ महाविद्यालय जोगेश्वरी पुर्व मुंबई येथील स्पोर्ट कॉम्पलेक्स इमारत येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ४८३९८१/- |
| २४ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ईस्माईल युसुफ महाविद्यालय जोगेश्वरी पुर्व मुंबई येथील जुनी विज्ञान इमारत येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ४७५८९०/- |
| २५ | मुळगौण कामांतर्गत शास्त्रीनगर पोलिस वसाहत, इमारत क्र. १०, गोरेगाव (प) मुंबई येथे दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | रु. ८३४६६९/- |
| २६ | विशेष दुरुस्ती अंतर्गत ४० पोलीस कर्मचारी निवासस्थाने, वॉटरफिल्ड रोड. वांद्रे (प), एफ इमारत मुंबई येथे गिलावा व रंगकाम व इतर अनुगिंक कामे करणे. | रु. ६३१६६७/- |
| २७ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ईस्माईल युसुफ महाविद्यालय जोगेश्वरी पुर्व मुंबई येथील वसतिगृह इमारत येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. २५१७८१/- |
| २८ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ईस्माईल युसुफ महाविद्यालय जोगेश्वरी पुर्व मुंबई येथील विस्तारीत इमारत येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ३१७८२१/- |
| २९ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ईस्माईल युसुफ महाविद्यालय जोगेश्वरी पुर्व मुंबई येथील मुख्य इमारत येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ८०८७५०/- |
| ३० | मुळगौण कामांतर्गत फूड अँड ड्रग्स प्रशासकीय इमारत, बीकेसी, वांद्रे (पू), मुंबई येथे पंप रूम आणि तपासणी कक्षाची दुरुस्ती करणे. | रु.८४५०००/- |
| ३१ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत उच्च न्यायालय गेस्ट हाऊस, मरोळ पुर्व मुंबई येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. २८३८४१/- |
| ३२ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत एम . एम. कोर्ट, मरोळ पुर्व मुंबई येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ४३८७९८/- |
| ३३ | मुळगौण कामांतर्गत फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी मेन बिल्डिंग, कोळे कल्याण, कलिना, सांताक्रूझ (ई) येथे प्रवेशद्वार छत आणि संबंधित कामाचे नूतनीकरण करणे. | रु.२४२०७५/- |
| ३४ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत एम आय डी सी पोलीस स्टेशन, मरोळ पुर्व मुंबई येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. २७७७५०/- |
| ३५ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत अंधेरी पोलीस स्टेशन, एसीपी कार्यालय व लॉकअप रुम येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. २२४१३१/- |
| ३६ | विशेष दुरुस्ती अंतर्गत ६०० पोलीस निवासस्थाने मरोळ अंधेरी पुर्व मुंबई येथील "ड "प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. ड-१५ मधील प्रसाधनगृह, शौचालयाची दुरुस्ती करणे व इतर अनुषांगिक कामे करणे | रु.६३१९९७/- |
| ३७ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ईस्माईल युसुफ महाविद्यालय जोगेश्वरी पुर्व मुंबई येथील गार्ड चौकी, पोलीस चौकी, सर्व्हेंट निवासस्थाने. गॅरेज स्टोर, वसतिगृह बॅरेक्स, पंप रुम, लेडीज रुम येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. १९९८१०/- |
| ३८ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ईस्माईल युसुफ महाविद्यालय जोगेश्वरी पुर्व मुंबई येथील खेळाचे मैदान येथे दरवाजे, खिडक्या, कडी/ कोयंडे, शटर/ फ्रेम, जल व मल निस्सारण वाहिन्या व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ८४३९०१/- |
| ३९ | विशेष दुरुस्ती कामांतर्गत ३२ हवालदार निवासस्थाने चेंबूर येथील अ विंग मध्ये येथे सिमेंट गिलावा, रंगकाम, दरवाजे खिडक्या व लादयांची दुरुस्ती करणे | रु. ८३८२४५/- |
| ४० | विशेष दुरुस्ती कामांतर्गत इमारत क्रं. 8 रेल्वे पोलीस वसाहत घाटकोपर येथे सिमेंट गिलावा, रंगकाम, दरवाजे खिडक्या व लादयांची दुरुस्ती करणे | रु. ८३९५५०/- |
| ४१ | विशेष दुरुस्ती कामांतर्गत प्रकार -२, इमारत क्रं. ३ राज्य कामगार विमा योजना रुग्णालय मुलुंड येथे सिमेंट गिलावा, रंगकाम, दरवाजे खिडक्या व लादयांची दुरुस्ती करणे | रु. ८४०३४०/- |
| ४२ | मुळगौण कामांतर्गत औदयोगिक प्रशिक्षण संस्था बोरीवली, मालाड (प) मुंबई येथे टर्नर रुमचे नुतनीकरण करणे. | रु.८४११४४/- |
| ४३ | मुळगौण कामांतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई येथे बुक स्टॉलजवळ मुलींच्या कॉमन रूमची सुधारणा करणे | रु.८२२६९५/- |
| ४४ | मुळगौण कामांतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई येथील जुन्या विज्ञान इमारतीतील मुलींच्या कॉमन रूमची सुधारणा करणे. | रु.८२२७९०/- |
| ४५ | मुळगौण कामांतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई येथे मुख्य इमारतीच्या टेरेसचे वॉटरप्रूफिंग करणे. | रु.८११४२५/- |
| ४६ | मुळगौण कामांतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई येथे अॅनेक्स इमारतीच्या टेरेसचे वॉटरप्रूफिंग करणे. | रु.८२३१८५/- |
| ४७ | मुळगौण कामांतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई येथे जिमखाना इमारतीच्या टेरेसचे वॉटरप्रूफिंग करणे. | रु.८४३५२०/- |
| ४८ | मुळगौण कामांतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई येथे नवीन विज्ञान इमारतीच्या टेरेसचे वॉटरप्रूफिंग करणे. | रु.७८८८४५/- |
| ४९ | मुळगौण कामांतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पू), मुंबई येथील मुख्य इमारतीच्या दगडी भिंतीवर केमिकल भरणे. (बुरशीविरोधी) | रु.८२२८२५/- |
| ५० | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत राज्य राखीव पोलिस बल गट क्र. ८, युनीट-२३, हॉस्पिटल क्र. १, मेस बॅरेक-२ ते ६, रेस्ट हाऊस बॅरेक , गोरेगाव (पू) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ७०१७३९/- |
| ५१ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत राज्य राखीव पोलिस बल गट क्र. ८, ४ रुम चाळ, १ रुम चाळ,, ऑब्जर्वर रुम, युनीट-२३, बॅरेक क्र. १,२ , युनीट-२४, गोरेगाव (पू) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ७३१५५५/- |
| ५२ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत राज्य राखीव पोलिस बल गट क्र. ८, युनीट-२३, बॅरेक-४ ते ६, आरमरी बॅरेक, वायरलेस रिले स्टेशन, गोरेगाव (पू) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ५८८७३२/- |
| ५३ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत कांदीवली पोलिस स्टेशन, जॉईन कमिशनर कार्यालय, समतानगर, कांदीवली (प) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. २९०६२८/- |
| ५४ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत मालवणी पोलिस स्टेशन, मुलांचे वसतीग्रह, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदीवली (पू) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तींची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ३०१२३५/- |
| ५५ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत ६० खाटांचे सामान्य रुग्णालय मालवणी, मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ३०५४३०/- |
| ५६ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत औदयोगिक प्रशिक्षण संस्था, मालवणी, मालाड, मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ३२९५६८/- |
| ५७ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत प्राचार्य आणि महिला सुपरिटेंडेंट वसाहत, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, कांदीवली (पू), मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. २११७५८/- |
| ५८ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत मेस क्लब येथील मुलांचे वसतीग्रह, कनिष्ठ सहाय्यक वसाहत, वरिष्ठ सहाय्यक सुपरिटेंडेंट, जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालय, कांदीवली (पू), मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ४६२३९०/- |
| ५९ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत, फोर्स वन मुख्यालय , गोरेगांव (पूर्व), मुंबई येथील प्रशासकिय इमारत क्र.१ येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ६७०९८६/- |
| ६० | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत, फोर्स वन मुख्यालय, गोरेगांव (पूर्व), मुंबई येथील शासकिय अनिवासी इमारत क्र.७ व बॅफल फायरींग रेंज येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ३३८७८६/- |
| ६१ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत, तहसिलदार कार्यालय व तलाठी कार्यालय चावडी बॅरेक व बोरीवली पोलिस लॉक अप व एम. एच. बी. कॉलनी , बोरीवली (प.) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ४०७३२५/- |
| ६२ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत पी एम कोर्ट, बोरीवली(प), मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. १९५६५८/- |
| ६३ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत बोरीवली पोलिस स्टेशन, बोरीवली (प.), दहिसर पोलिस स्टेशन, दहिसर (प) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ४४६१५६/- |
| ६४ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत मेघवाडी पोलिस स्टेशन, जोगेश्वरी, (पू), मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. २६८३४६/- |
| ६५ | किरकोळ दुरुस्ती अंतर्गत नगर दिवाणी व सत्र न्यायालय, दिंडोशी, गोरेगाव (पू) मुंबई येथील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. ( कालावधी -७ महिने) | रु. ८२१४५६/- |
| ६६ | मूळगौण कामांतर्गत मुलुंड पोलीस स्टेशन, मुलुंड (प.) मुंबई येथे प्लिंथ संरक्षण चे काम करणे. | रु.460279/- |
| ६७ | मूळगौण कामांतर्गत मुलुंड पोलीस स्टेशन, मुलुंड (प.) मुंबई येथे पेव्हर ब्लॉक आणि कंपाऊंड वॉलचे काम करणे. | रु.840432/- |
| ६८ | मूळगौण कामांतर्गत मुलुंड पश्चिम येथील मुलुंड पोलीस स्टेशन, ड्रेनेज लाईनची दुरुस्ती. | रु.840592/- |
| ६९ | भास्कर कोर्ट, वांद्रे (पूर्व) मुंबई-५१ येथे वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (मार्च २०२५ अखेर) | रु.५२०६२१/- |
| ७० | कौटुंबिक न्यायालय इमारत, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई-५१ येथे वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (मार्च २०२५ अखेर) | रु.४७१८३१/- |
| ७१ | कामगार आयोग इमारत, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई-५१ येथे वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (मार्च २०२५ अखेर) | रु.५१७३१०/- |
| ७२ | अधिदान व लेखा कार्यालय इमारत, वांद्रे-कुर्ला संकुल. वांद्रे (पूर्व) मुंबई-५१ येथे वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (मार्च २०२५ अखेर) | रु.५५०६४३/- |
| ७३ | उप अभियंता, वांद्रे सा.बां उपविभाग क्र-२ वांद्रे (पूर्व) मुंबई-५१ कार्यालयातील वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (मार्च २०२५ अखेर) | रु.१७३९८०/- |
| ७४ | शासकीय तंत्र निकेतन बांद्रा पूर्व आवारातील कार्यशाळा इमारत, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई व निर्मल नगर पोलीस स्टेशन बांद्रा पूर्व तसेच स्टेट फायर ट्रेनिंग स्कूल, कोले कल्याण सांताक्रूझ पूर्व येथील अनिवासी इमारती अंतर्गत वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे करणे बाबत. (मार्च २०२५ अखेर) | रु.७४८३६५/- |
| ७५ | वस्तू व सेवाकर भवन बांद्रे (पू.) येथील इमारती अंतर्गत वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे करणे बाबत. | रु.८३५८३५/- |
| ७६ | अन्न व औषध प्रशासन विभाग, बांद्रे पूर्व येथील इमारती अंतर्गत वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे करणे बाबत. (मार्च २०२५ अखेर) | रु.८३६३४०/- |
| ७७ | कोले कल्याण सांताक्रूझ पूर्व येथील न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा इमारतीच्या आवारातील मुख्य इमारत, विस्तारीत इमारत तसेच ट्रेनिंग सेंटर इत्यादी अनिवासी इमारती अंतर्गत वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे करणे बाबत. (मार्च २०२५ अखेर) | रु.७६८८२५/- |
| ७८ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत पोलीस कर्मचारी निवासस्थाने, अंधेरी (पू), मुंबई - ए, बी, सी इमारत, ८० पोलीस उपनिरीक्षकांची निवासस्थाने डी. एन. नगर येथील इमारत क्र. ५ ते ८. येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.७४५५७०/- |
| ७९ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ८० पोलीस हवालदार निवासस्थाने,डी. एन. नगर येथील इमारत क्र. ३३ अंधेरी (प) येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.२२१५८७ /- |
| ८० | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ८० पोलीस हवालदार निवासस्थाने,डी. एन. नगर येथील इमारत क्र. ३४ अंधेरी (प) येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.२२१६०३/- |
| ८१ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ८० पोलीस हवालदार निवासस्थाने, आराम नगर येथील इमारत क्र. ४ ते ५ अंधेरी (प) येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.५६२४६४/- |
| ८२ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ३२, पोलीस उपनिरिक्षक निवासस्थाने, अंधेरी (पु), मुंबई. येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.८४३६८०/- |
| ८३ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत घोडबंद रोड, अंधेरी येथील स्टोअर्स शेड व निवासी गाळे (पत्राशेड एस.व्ही.रोड) येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.४६८०२/- |
| ८४ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ४०० पोलीस निवासस्थान येथील "अ" प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. अ-१, अ-२ व अ-३ (३ इमारती) मरोळ अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे | रु. ७०२९००/- |
| ८५ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ४०० पोलीस निवासस्थान येथील "अ" प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. अ-४ व अ-५ (२ इमारती) मरोळ अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ४६७९९५/- |
| ८६ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ४०० पोलीस निवासस्थान येथील "ब" प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. ब-१, ब-२ व ब-३ (३ इमारती) मरोळ अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ७०२८७०/- |
| ८७ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ४०० पोलीस निवासस्थान येथील "ब" प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. ब-४ व ब-६(२ इमारती) मरोळ अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ४६७९००/- |
| ८८ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ४०० पोलीस निवासस्थान येथील "अ" प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. क-१, क-२ व क-३ (३ इमारती) मरोळ अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे | रु. ८४३७७५/- |
| ८९ | वार्षिक देखभाल व दुरुस्तो अंतर्गत ४०० पोलीस निवासस्थान येथील "क" प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. क-४ व क-५ (२ इमारती) मरोळ अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ७१०६५०/- |
| ९० | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ६०० पोलीस निवासस्थान येथील "ड" प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. ड-१३ व ड-१८ ( ६इमारती) मरोळ अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ६६११००/- |
| ९१ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ६०० पोलीस निवासस्थान येथील "ड" प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. ड-७ ते ड-१२ ( ६इमारती) मरोळ अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ६६१९५०/- |
| ९२ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ६०० पोलीस निवासस्थान येथील "इ" प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. इ-१ ते इ-६ ( ६इमारती) मरोळ अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु.८२६११९/- |
| ९३ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ६०० पोलीस निवासस्थान येथील "इ" प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. इ-७ ते इ-१२ ( ६इमारती) मरोळ अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ८२५९९०/- |
| ९४ | वार्षिक देखभाल व दुरुस्ती अंतर्गत ६०० पोलीस निवासस्थान येथील "इ" प्रकारच्या इमारतीमधील इमारत क्र. इ-१३ ते इ-१८ ( ६इमारती) मरोळ अंधेरी (पुर्व ), मुंबई येथे खिडक्या, दरवाजे, पाईपलाईन , रंगकाम, प्लॉस्टर करणे व इतर अनुषांगिक कामे करणे . | रु. ८२५८७०/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ १०६६७
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :- 27 NOV 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/४८६८

महाराष्ट्र क्राईम टाइम्स




# देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीनंतर मुंबईतून १ हजार ९६३ बॅनर्स, झेंडे काढले, 'या' वॉर्डात सर्वाधिक बॅनर्स

■ मुंबई : गणेश बागडे

मुंबईत ५ डिसेंबर २०२४ या दिवशी देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि इतर दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत मुंबईतल्या आझाद मैदानावर हा सोहळा पार पडला. यानंतर मुंबई महापालिकेने १ हजार ९६३ बॅनर, झेंडे शहरातून काढले आहेत.

मुंबई महापालिकेने देवेंद्र फडणवीस शपथविधी सोहळा आटोपल्यानंतर दोन दिवसांनी शहरातून १ हजार ९६३ बॅनर्स, फोटो, अभिनंदाचे फलक आणि झेंडे आता काढले आहेत. यातले ७६६ बॅनर्स हे एकट्या आझाद मैदान परिसरात होते. आझाद मैदानात देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी सोहळा पार पडला. त्यामुळे १ हजार ९६३ बॅनर्स, झेंड्यापैकी ७६३ बॅनर्स हे याच परिसरात होते.५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी सोहळा पार पडला. या सोहळ्याच्या आधी म्हणजेच ४ डिसेंबरला देवेंद्र फडणवीस हेच राज्याचे मुख्यमंत्री होतील ही घोषणा झाली. ज्यानंतर मुंबईतल्या अनेक प्रमुख भागांमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदानचे बॅनर्स आणि झेंडे लागले होते. यापैकी आझाद मैदान परिसरात ७६६ बॅनर्स लागले होते. मुंबईकरांना एखादा रिकामा कोपरा हा अभावानेच पाहण्यास मिळत होता. आता हे सगळे बॅनर्स आणि झेंडे उतरवण्यात आले आहेत. भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) अशा तिन्ही पक्षांकडून बॅनर्स आणि झेंडे लावण्यात आले होते. यापैकी काही अनधिकृत बॅनर्सबाबत नागरिकांनी चिंताही व्यक्त केली होती. काही



बॅनर्समुळे वाहतुकीची चिन्ह, फूटपाथ आणि ठिकाणांची नावं झाकली जात होती. त्यामुळे लोकांनी चिंता व्यक्त केली होती. आता ही सगळी बॅनर्स उतवरण्यात आली आहेत. मुंबईचे आयुक्त भूषण गगराणी आणि अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांनी अधिकाऱ्यांना मुंबईत स्वच्छता मोहीम राबवण्याच्या सूचना शनिवारी दिल्या. त्यानंतर क्लिन ड्राईव्ह चालवण्यात आला आणि मुंबई महापालिकेने १९६३ बॅनर्स आणि झेंडे उतरवले आहेत. मुंबई महापालिकेच्या माहितीनुसार ९१२ झेंडे, ५८३ राजकीय बॅनर्स आणि ४४३ धार्मिक तसंच सामाजिक आशय किंवा संदेश असलेले बॅनर्स उतरवण्यात आले आहेत. चर्चगेट आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरातून ६०५ झेंडे आणि ५६ राजकीय बॅनर्स उतरवण्यात आली आहेत. तर १०५ सामाजिक आशय, विषयाशी संबंधिक फलक खाली आणण्यात आले आहेत. शुक्रवारी म्हणजेच ज्या दिवशी देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी सोहळा पार पडला त्यादिवशी साधारण ५ हजार किलोंचा कचरा आझाद मैदानातून बाहेर काढण्यात आला. भांडूपच्या एस वॉर्डमधील १४० बॅनर्स काढण्यात आली आहेत.

## के उत्तर विभाग कार्यालय अद्याप सुरू नाही; निवडणूकीच्या तोंडावर घाईघाईत उद्घाटन

■ मुंबई : राकेश गायकवाड

कोणत्याही क्षणी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाही होण्याच्या धसक्याने महापालिकेच्या विविध विकासकामांचे घाईघाईत भूमीपूजन करण्यात आले. त्याच वेळी पालिकेच्या के उत्तर विभाग कार्यालयाचेही उद्घाटन करण्यात आले. माजी मात्र निवडणुकीचा निकाल लागून सत्तास्थापनही झाले. मात्र अद्याप हे कार्यालय प्रत्यक्षात सुरू झालेले नाही.

विधानसभा निवडणुकीच्या




तोंडावर महापालिकेच्या विविध विकासकामांचे उद्घाटन व लोकार्पण करण्यात आले. त्याचादरम्यान, अंधेरी, जोगेश्वरी पूर्वचा भाग असलेल्या महापालिकेच्या के उत्तर विभाग कार्यालयाचेही उद्घाटन घाईघाईने करण्यात आले. के पूर्व विभाग कार्यालयाचे विभाजन गेल्या कित्येक वर्षापासून रखडले होते. मात्र विधानसभा निवडणुकीपूर्वीचा मुहूर्त साधत या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या विभाग कार्यालयाचे उद्घाटन शुक्रवारी ११ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. मात्र निवडणुकीची आचारसंहिता संपुष्टात आली. मतमोजणीअंती निकाल जाहीर झाला. सरकारही स्थापन झाले. तरी हे कार्यालय पूर्णतः सुरू झालेले नाही. प्रशासकीय विभाग कार्यालयाच्या माध्यमातून पुरवण्यात येणाऱ्या १७ प्रकारच्या नागरी सेवा-सुविधा या कार्यालयात अद्यापही सुरू झालेल्या नाहीत. सध्या या कार्यालयात केवळ नागरी सुविधा केंद्र सुरू आहे, अशी माहिती येथील नागरिकांनी दिली. पालिका अधिकाऱ्यांनीही या वृत्ताला दुजोरा दिला. निवडणुकीमुळे पालिकेचे कर्मचारी निवडणूक कर्तव्यावर गेल्यामुळे हे कार्यालय सुरू करण्यास उशीर झाल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

या विभागातील शिवसेनेचे (शिंदे) खासदार रवींद्र वायकर यांच्या पाठपुराव्यामुळे झालेल्या कामांचे उद्घाटन व भूमीपजून तातडीने आणि घाईघाईत करण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मध्यरात्री २ वाजता या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले होते. या उद्घाटनासाठी पालिकेचे कर्मचारी अधिकारी, परिसरातील नागरिक, वायकर यांचे कार्यकर्ते ७ वाजल्यापासून हजर होते. उद्घाटनांचे सर्व कार्यक्रम करीत मुख्यमंत्र्यांना जोगेश्वरीत पोहोचण्यासाठी मध्यरात्रीचे २ वाजले. मात्र इतक्या तातडीने मध्यरात्री उद्घाटन केले तरी प्रत्यक्षात हे कार्यालय अद्यापही सुरू झालेले नाही. के उत्तर विभाग कार्यालयाअंतर्गत एकूण आठ प्रभागांचा समावेश आहे. एकूण ८.५० चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच्या क्षेत्रात हा विभाग विस्तारलेला आहे. अंदाजे चार लाखांहून अधिक लोकसंख्येचा समावेश या विभागामध्ये आहे.

## मारकडवाडीसह सर्व ठिकाणी ईव्हीएम मतदानात पारदर्शकता, जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांचे स्पष्टीकरण

■ सोलापूर: यश सावंत

माळशिरस विधानसभा मतदारसंघातील मारकडवाडी येथे ईव्हीएम यंत्रावर शंका उपस्थित करून मतपत्रिकेद्वारे चाचणी मतदान घेण्याची गावकऱ्यांनी केलेली तयारी आणि त्यास निवडणूक यंत्रणेने कायदेशीर कारवाईचा इशारा देत चाचणी मतदान रोखण्याच्या पार्श्वभूमीवर मारकडवाडीची चर्चा देशभर गाजत आहे. रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी स्वतः मारकडवाडीला भेट देऊन गावकऱ्यांशी साधलेल्या संवादानंतर जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सायंकाळी तातडीने एका पत्रकार परिषदेत ईव्हीएम यंत्र प्रणालीसह अन्य मुद्यांचे स्पष्ट शब्दात खंडन केले. कोणत्याही निवडणुकीचे मतदान घेण्याची अधिकार निवडणूक आयोगाला असून अन्य कोणालाही नाही. मारकडवाडीत गावकऱ्यांनी स्वतःच्या समाधानासाठी चाचणी मतदान घेण्याची घेतलेली भूमिका पूर्णतः बेकायदेशीर होती. यातून समाजात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचे मत जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्यक्त



केले. माळशिरससह अन्य सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये ईव्हीएम प्रणाली द्वारे राबविलेली मतदान प्रक्रिया पूर्णतः पारदर्शक असून त्यात प्रत्येक टप्प्यावर संबंधित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना सामावून घेण्यात आले होते. प्रत्येक टप्प्यात याबाबत कोणीही आक्षेप घेतला नाही. परंतु, आता शेवटी असा आक्षेप घेऊन निवडणूक आयोगाच्या संदर्भात अविश्वासाचे वातावरण निर्माण करणे चुकीचे आहे, असे कुमार आशीर्वाद यांनी स्पष्ट केले.

ईव्हीएम प्रणाली राबविण्यात पूर्वी १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट दरम्यान पहिल्या स्तरावर ईव्हीएम यंत्र तपासणी केली गेली. तेव्हापासून ते मतमोजणीपर्यंतच्या सर्व टप्प्यांवर प्रक्रिया राबवताना साक्षीदार म्हणून संबंधित राजकीय पक्षांचे प्रतिनिधी हजर होते. ईव्हीएम यंत्र गोदामात स्ट्रॉंगरूममध्ये ठेवल्यानंतर मतमोजणी होईपर्यंत तेथे अहोरात्र सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत होते. सीसीटीव्ही फुटेज कोणत्याही क्षणी संबंधित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना पाहण्याची आणि योग्य खात्री करून घेण्याची मुभा होती. यात प्रत्येक स्तरावर पारदर्शकता असताना त्याबद्दल आता पुरावे न देताच आक्षेप घेतले जात आहेत.

## देशातील ६० जिल्हे नक्षलमुक्त? देशातील नक्षलवादाची स्थिती

■ मुंबई : गणेश बागडे

गत पाच वर्षात चंद्रपूरसह देशातील ६० जिल्हे नक्षलमुक्त केल्याचे केंद्रीय गृह मंत्रालयाने म्हटले आहे. आजघडीला एकूण ३८ जिल्हे नक्षलग्रस्त असून, तेही लवकरच नक्षलमुक्त होतील, असा दावाही गृह मंत्रालयाने केला आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशात आजघडीला एकूण ३८ जिल्हे नक्षलग्रस्त आहे. पण, मागील पाच वर्षात देशभरातील एकूण ६० जिल्हे नक्षलमुक्त केले आहेत. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हा नक्षलमुक्त झाल्याचे गृह मंत्रालयाने म्हटले आहे. २०१५ मध्ये नक्षलवादाच्या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी राष्ट्रीय धोरण आणि कार्य योजनेला मंजुरी देण्यात आली होती. त्या नुसार सुरक्षेबाबत उपाययोजना, विकास योजना आणि स्थानिक जनतेचे हक्क आणि अधिकारावर भर देण्यात आला. सुरक्षेच्या पातळीवर केंद्रीय सुरक्षा दलाच्या तुकड्या आणि राज्य सरकारच्या पोलिस दलाचे आधुनिकीकरण करण्यात आले. त्यांना प्रशिक्षण,



आत्याधुनिक हत्यारे, उकरणे देण्यात आली. गुप्त माहितीचे आदान – प्रदान करण्यात आले. विशेष पोलिस ठाण्याची निर्मिती करण्यात आली. विकासाच्या पातळीवर नक्षलग्रस्त भागात रस्ते, दूरसंचार व्यवस्था आणि वित्तीय मदतीवर भर देण्यात आला. नक्षलग्रस्त जिल्हयांतील विविध विकास योजनांसाठी २०१९ – २० ते २०२३ – २४, या पाच वर्षाच्या कार्यकाळात ४३५०.७८ कोटी रुपये खर्च करण्यात आले. तर नक्षलवादाच्या विरोधात काम करणाऱ्या केंद्रीय संस्थांच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी ५६०.२२ कोटी रुपये खर्च करण्यात आले. नक्षलग्रस्त भागात १४,५२१ किलोमीटरचे रस्ते तयार करण्यात आले. दूरसंचार व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी ६५२४ टॉवर उभारण्यात आले. भागात ५७२१ पोस्ट कार्यालये सुरू करण्यात आले. प्रमुख ३० नक्षलग्रस्त जिल्हयांत १००७ बॅंकेच्या शाखा आणि ९३७ एटीएम सुरू केली. नक्षलग्रस्त ४६ जिल्हयांत ४९ कौशल्य विकास केंद्र सुरू केले. १७८ एकलव्य मॉडेल आश्रम शाळा सुरू केल्या. केंद्रीय सुरक्षा दल, राज्य सरकारच्या पोलिस दलाकडून स्थानिक लोकांशी सतत चर्चा, संवाद घडवून आणला.

## शपथ घेतली, चिंता मिटली; अजित पवारांना दिलासा, मालमत्तेवर टाच आणण्याचा आदेश रद्द

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

महायुती सरकारच्या शपथ विधीच्या दिवशीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची खऱ्या अर्थाने चिंता मिटली आहे. उपमुख्यमंत्री पद तर मिळालेच पण अजित पवारांशी संबंधित कारखान्याच्या मालमत्तेवर टाच आणण्याचा आदेश दिल्लीतील लवादाने रद्द केल्याने त्यांना दुहेरी लाभ झाला. पहाटेच्या शपथविधीनंतर सिंचन घोटाळ्यात अभय तर महायुती सरकारमधील शपथविधीच्या दिवशीच शेकडो कोटीच्या मालमत्तेवरील टाच उठली आहे. यावरून विरोधकांनी टीका केली आहे. अजित पवार विरोधी पक्षात असताना सातारा जिल्हयातील जरंडेश्वर साखर कारखान्याची मालमत्ता लिलावात खरेदी करण्यावरून ईडी व प्राप्तिकर विभागाने कारवाई केली होती. अजित पवार यांच्या भगिनींच्या निवासस्थानी तीन दिवस छापे पडले होते. जरंडेश्वर साखर कारखान्याची मालमत्ता अजित पवार यांच्या नातेवाईकांनी खरेदी केल्याचा आरोप झाला होता. त्या दृष्टीने ईडी व अन्य यंत्रणांनी तपास केला होता. लिलावात हा कारखाना ताब्यात घेणाऱ्या कंपनीने बेनामी कंपन्यांच्या माध्यमातून पैसे उभे केल्याच आरोप झाला होता. अजित पवार यांचे जवळचे नातेवाईक , त्यांच्या निकटवर्तीयांशी संबंधितांकडून हा कारखाना चालविण्यास घेण्यात आला होता. तसेच अजित पवार



हे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे संचालक असताना कारखाना चालविणाऱ्या कंपनीला सुमारे ७०० कोटींचे कर्ज मंजूर झाले होते याकडे केंद्रीय यंत्रणांनी लक्ष वेधले होते. जरंडेश्वर साखर कारखान्याची मालमत्ता खरेदी केलेल्या कंपनीशी अजित पवार व त्यांच्या कुटुंबीयांचा थेट संबंध असल्याचे ईडीला आढळले होते. अजित पवार, पत्नी सुनेत्रा आणि पुत्र पार्थ यांनी मालमत्ता खरेदीसाठी बेनामी व्यवहार केल्याचा आरोप झाला होता. यातूनच पुढे जरंडेश्वर साखर कारखान्याच्या मालमत्तेवर आयकर विभागाने टाच आणली होती. या विरोधात दाखल झालेल्या अपिलावर 'दी स्मगलर्स ॲण्ड फॉरेन एक्सचेंज मॅन्यूप्लेटर्स' कायद्याअंतर्गत लवादाने टाच आणण्याचा आदेश रद्द केला आहे. केंद्रीय यंत्रणेने दाखल केलेले अपील लवादाने फेटाळून लावले. अजित पवार, सुनेत्रा पवार वा पार्थ पवार यांनी कथित बेनामी मालमत्ता खरेदीसाठी पैसे पुरविल्याचा फिर्यादी पक्ष पुरावा सादर करू शकलेले नाही, असे लवादाने निरीक्षण नोंदविले आहे. लवादाच्या निर्णयामुळे अजित पवार व त्यांच्या कुटुंबीयांची सुमारे एक हजार कोटींची मालमत्ता आता मोकळी झाली आहे.

## 'दोन वर्षांत खड्डेमुक्त मुंबई'चे स्वप्न अधुरेच; शिंदे सरकारच्या काळात रस्त्यांची ३० टक्केच कामे पूर्ण

■ मुंबई : विशाल कारंडे

दोन वर्षात मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन हवेत विरले आहे. शहर भागातील रस्त्याच्या कामांना आणि दुसऱ्या टप्प्यातील कामांना अलीकडेच सुरुवात झाली असून उपनगरांतील कामेही कूर्मगतीने सुरू आहेत. आतापर्यंत पहिल्या टप्प्यातील केवळ ३० टक्के कामे झाली आहेत. मुंबईतील दोन हजार किमी रस्त्यांचे गेल्या काही वर्षापासून टप्प्याटप्प्याने कॉंक्रीटीकरण केले जात आहे. यापैकी पन्नास टक्के रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण झाले आहे. दोन वर्षात मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्याचा संकल्प शिंदे यांनी २०२२ मध्ये सोडला होता व पालिका प्रशासनाला तसे निर्देश दिले होते. त्यानंतर पहिल्या टप्प्यातील तब्बल ६,०७८ कोटींच्या कामांसाठी निविदा मागवण्यात आल्या. त्यातून पाच नामांकित कंत्राटदारांची निवड करून जानेवारी २०२३मध्ये कार्यादेश देण्यात आले. मात्र शहर भागातील रस्त्यांची कामे ऑक्टोबरमध्ये सुरू झाली. तर पूर्व आणि पश्चिम उपनगरांतील कामांची गती कमी आहे. गेल्या दोन वर्षात पहिल्या टप्प्यातील ४०० किमी रस्त्यांपैकी केवळ ३० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. एकीकडे ही स्थिती असताना दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठीही निविदा मागवून ऑगस्ट२०२४ मध्ये कार्यादेश देण्यात आले.



पहिल्या टप्प्यातील ३९२ किलोमीटर लांबी रस्त्यांची कामे अर्धवट असताना दुसऱ्या टप्प्यात ३०९ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे कॉंक्रीटीकरणही ऑक्टोबरपासून सुरू झाले. मात्र ही कामे एकाचवेळी सुरू असल्यामुळे वाहतूक पोलिसांची परवानगी, उपयोगिता वाहिन्या सरकवणे, रस्ते बांधणीपूर्वीची पर्जन्यजलवाहिन्यांची कामे यामुळे वेळ लागत असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

पहिल्या टप्प्यातील कामांचा कालावधी २०२६ पर्यंत होता. तर दुसऱ्या टप्प्यातील कामांचा कालावधी २०२८पर्यंत आहे. मात्र पहिला टप्पा २०२५ पर्यंत व दुसरा टप्पा २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवल्याचे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले. रस्त्यांवरील खड्ड्यांचे प्रमाण कमी होत असून पावसाळ्यात मुंबईकरांना बदल नक्कीच दिसेल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. पहिल्या टप्प्यातील कामे ३१ मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले. त्यासाठी दररोज किमान एक किमीचा रस्ता पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले असून कंत्राटदारांनाही सूचना दिल्या आहेत. दर आठवड्याला कामाचा आढावा घेतला जात आहे. गेल्या वर्षी ज्या रस्त्यांवर खड्डे होते ते रस्ते प्राधान्याने हाती घेतले जाणार असल्याचे बांगर म्हणाले.

## धारावीतील ३०० हून अधिक रहिवाशांना १० कोटी रुपयांचा वैद्यकीय विमा

■ मुंबई : नितीन देवळेकर

धारावीत दाटीवाटीत, झोपडपट्टीत मोठ्या संख्येने लोक राहतात. अशावेळी त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे धारावीकरांची आरोग्य सुरक्षा लक्षात घेत धारावी सोशल मिशनच्या (डीएसएम) लोक विकास उपक्रमाद्वारे धारावीतील ३०० हून अधिक रहिवाशांची सरकारी कल्याणकारी योजनांअंतर्गत नोंदणी करत त्यांना वैद्यकीय विमा योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. विम्याची एकूण रक्कम १० कोटी रुपये अशी आहे. तर इतर सरकारी योजनांसाठी १९७ जणांनी नोंदणी केली आहे. धारावीतील बहुसंख्य लोक असंघटीत क्षेत्रात काम करतात. या क्षेत्रातील व्यक्तींसाठी सरकारच्या अनेक योजना आहेत. आयुष्यमान भारत, ई-श्रम कार्ड आणि प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना यासारख्या कल्याणकारी योजना अंसघटीत क्षेत्रातील कामगारांना आर्थिक आणि आरोग्य सुरक्षा प्रदान करतात. मात्र जागरुकतेचा अभाव आणि इतर कारणांमुळे अनेक कामगार या योजनांच्या लाभापासून दूर राहतात. ही बाब लक्षात घेत डीएसएमने पुढाकार घेत धारावीतील रहिवाशांना, कामगारांना अशा योजनांचा लाभ



मिळवून देण्यासाठी लोक विकास उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत ३०० हून अधिक रहिवाशांची नोंदणी करत त्यांना वैद्यकीय विमा लागू केला आहे. विम्यांची एकूण रक्कम १० कोटी रुपये अशी आहे.

## नायर रूग्णालय दंत महाविद्यालयाचा अमेरिकास्थित 'पिएर फॉचर्ड अकॅडमी'तर्फे सन्मान!

■ मुंबई : यश सावंत

सामाजिक क्षेत्रातील योगदानासाठी, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका स्थित 'पिएरी फॉचर्ड अकॅडमी' च्या माध्यमातून दिला जाणारा अत्यंत मानाचा असा पुरस्कार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रूग्णालय दंत महाविद्यालयाला प्रदान करण्यात आला आहे. 'आशिया पॅसिफिक प्रदेशात सर्वोत्तम सामाजिक सेवा' या श्रेणीतील हा पुरस्कार आहे.

नवी दिल्ली येथे पार पडलेल्या सोहळ्यात पिएरी फॉचर्ड अकॅडमीच्या आंतरराष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शेरील बिलिंगस्ले यांच्या हस्ते, नायर रूग्णालय दंत महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. नीलम अंद्राडे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. पिएरी फॉचर्ड अकॅडमीची स्थापना सन १९३६ मध्ये झाली. आधुनिक दंतशास्त्राचे जनक मानले जाणारे फ्रेंच दंतचिकित्सक पिएरी फॉचर्ड यांच्या स्मरणार्थ आणि विविध क्षेत्रातील योगदानासाठी या अकॅडमीच्या वतीने पुरस्कार दिले जातात. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार तसेच गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्याचे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. पिएर फॉचर्ड अकॅडमीने दिलेल्या मानाच्या पुरस्कारामुळे येत्या काळात आणखी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वसामान्यांना सेवा देण्यासाठीची नायर रूग्णालय दंत महाविद्यालयालाची जबाबदार वाढली आहे, असे मत अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा यांनी व्यक्त केले. बृहन्मुंबई महानगरपालिका संचालित आणि मुंबई सेंट्रल स्थित नायर रुग्णालय दंत महाविद्यालय हे सर्वात जुन्या महाविद्यालयांपैकी दुसऱ्या क्रमांकाचे



रूग्णालय आहे. या रूग्णालयाची स्थापना १९३३ मध्ये झाली होती. रूग्णालयात दरदिवशी सरासरी १ हजार ते १२०० रूग्ण मौखिक आरोग्याशी संबंधित उपचारासाठी येतात. तर वार्षिक सरासरी साडेतीन लाख रुग्ण दंत उपचारासाठी येतात. नायर रुग्णालय दंत महाविद्यालयाच्या वतीने रूग्ण सेवेच्या पलीकडे जाऊन मोठ्या संख्येने सामाजिक उपक्रम देखील राबवले जातात. या रूग्णालयाच्या सार्वजनिक आरोग्य सामाजिक विभागाच्या वतीने विविध ठिकाणी 'पोर्टेबल डेन्टल व्हन ऑन व्हील' संकल्पनेवर आधारित शिबिरांचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये विविध दवाखाने, वृद्धाश्रम, तुरूंग, दृष्टी नसणारे विद्यार्थी, अनाथ आणि निराधार मुले, देहविक्रय करणाऱ्यांच्या वस्तीतील मुलांच्या शाळा तसेच रोटरी कुब याठिकाणी दंत शिबिरांचे आयोजन करण्यात येते. शिबिराच्या ठिकाणी प्रामुख्याने मौखिक आरोग्यासाठी जनजागृती करण्याकरिता दंत महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी आणि विद्यार्थ्यांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न करण्यात येतात. अशा सर्व उपक्रमांची दखल घेत पिएरी फॉचर्ड अकॅडमीने नायर रूग्णालय दंत महाविद्यालयाच्या सामाजिक योगदानाचा पुरस्कार देऊन सन्मान केला आहे.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# जैन मंदिरात घुसून चोऱ्या करणाऱ्याला स्वारगेट पोलिसांनी केले जेरबंद

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

जैन साधकांचा वेष परिधान करून जैन मंदिरात घुसून चोऱ्या करणाऱ्या एकाला स्वारगेट पोलिसांनी जेरबंद केले. त्याने पुण्यासह राज्यातील घाटकोपर वाई, चिखली, डोंबिवली अशा ठिकाणी देखील चोऱ्या केल्याची माहिती समोर आली असून, पैशांची चणचण भासत असल्याने चोऱ्या केल्याचे समोर आले आहे. त्याच्याकडून सव्वा चार लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. नरेश आगरचंद जैन (वय ४५, रा. बोम्बे चाळ, सी.पी. टैंक गिरगाव, व्ही. पी. रोड, मुंबई) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. ही कारवाई परिमंडळ दोनच्या उपायुक्त स्मार्तना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरिक्षक युवराज नांद्रे, पोलीस अंमलदार शंकर संपते, सागर केकाण, कुंदन शिंदे व त्यांच्या पथकाने केली आहे. कार्तिकी पोर्णिमेनिमित्त जैन समाज मंदिरांमध्ये तसेच घरातील देवांची पूजा करतात. त्यादिवशी देवाला दागिने देखील घातलेले असतात. स्वारगेट परिसरात एका घरफोडीत घरातील जैन मंदिरातून दागिने नेले होते. तर, पुनावाला गार्डन येथील एका मंदिरात देखील चोरी झाली



होती. तेथून सोन्याचे मुकूट व चैन चोरून नेली होती. यासोबतच आणखी तीन ते चार ठिकाणी जैन मंदिरात चोरीच्या घटना घडल्या होत्या. जैन समाजाच्या भावना लक्षात घेऊन वरिष्ठ निरिक्षक युवराज नांद्रे यांनी तत्काळ याचे गांभिर्य लक्षात घेऊन विशेष तपासपथकाची निर्मिती केली होती. तसेच, आरोपींचा माग काढण्याबाबत सूचना केल्या होत्या. त्यानूसार, तांत्रिक विश्लेषन व सीसीटीव्ही तपासले. पुणे आणि मुंबई अशा दोन शहरात खबऱ्यांकडून माहीती काढली. तेव्हा पोलीस हवालदार सागर केकाण यांना बातमीदाराकडून माहीती मिळाली की, अशा प्रकारचे गुन्हे मुंबई, डोंबिवली व इतर परिसरात घडले असून त्यातील आरोपी मुंबईतील गिरगाव भागात राहण्यास आहे. त्यानूसार, पथकाने तत्काळ गिरगाव गाठले. तसेच, शोध घेऊन संशयीत आरोपी नरेश जैन याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे सखोल तपास केला असता त्याने गुन्हे केल्याची कबूली दिली. त्याच्याकडून पोलिसांनी ४ लाख २० हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. पैशांच्या चणचण भासत असल्याने गुन्हे केल्याचे समोर आले आहे. त्याने यापुर्वी देखील घाटकोपर वाई, चिखली, डोंबिवली इत्यादी भागात सुमारे ८ ते १० ठिकाणी अशाच पध्दतीने मंदीरांमध्ये घरफोडीचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. मंदिरात जाताना जैन साधकांच्या वैशात जाऊन देवाचेच दागिने चोरी करत होता.

## सातारा शहर पोलिसांची कारवाई; घरफोडीतील अट्टल गुन्हेगारास पाठलाग करून पकडले

**सातारा : विशेष प्रतिनिधी**

गोडोली येथील गौरव रेसिडेन्सी मध्ये घरफोडी करून फरार झालेल्या अट्टल गुन्हेगाराला सातारा शहर पोलिसांनी धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुका परिसरात पाठलाग करून पकडले आहे. पोलिसांनी पाळत ठेवून अवघ्या महिन्याभरात हा घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. राजकुमार उर्फ राजू ओमकार जाणार असल्याची माहिती प्राप्त झाली होती, त्यानुसार पोलिसांनी तीन दिवसांपूर्वी संशयिताला पकडण्यासाठी सापळा रचला होता. दरम्यान शेतातून पळून जाण्याचा प्रयत्न करताना पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. ओंकार आपचे हा अट्टल गुन्हेगार असून, त्याच्यावर २५ घरफोड्या केल्याच्या गुन्ह्याची नोंद आहे. न्यायालयासमोर त्याला हजर केले असता



आपचे (वय ३०, रा. कोथळी, ता. उमरगा, जि. धाराशिव) व हर्षद सत्तार बागवान (वय ३२, रा. शनिवार पेठ, कच्छी स्टार बिल्डिंग, सातारा) यांना अटक करण्यात आली आहे. दिनांक २६ नोव्हेंबर रोजी गौरव रेसिडेन्सी, गोडोली येथे बंद घराचे कुलूप तोडून दोघांनी दागिन्यांची चोरी केली होती. याबाबत सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली होती. पोलीस निरीक्षक राजेंद्र मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या माध्यमातून पोलीस संशयितांचा शोध घेत होते. धाराशिव जिल्ह्यातील उमरगा तालुक्यात संशयितांवर पाळत ठेवली होती. संशयित उमरगा तालुक्यातील आपल्या नातेवाईकाकडे त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. या चौकशीमध्ये साताऱ्यातील बागवान हर्षद याचे नाव पुढे आले असून, त्यालाही ताब्यात घेण्यात आले. दोघांकडून चोरीचा पुण्यातील पाच लाख साठ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल जायपत्रे करीत आहेत. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सुधीर मोरे, अशोक सावंगी, निलेश यादव, सुजित भोसले, निलेश जाधव, मोहन नाचन, पंकज मोहिते, विक्रम माने, इरफान मुलाणी, अमोल निकम, मच्छिंद्र माने, संतोष घाडगे, सागर गायकवाड, विशाल धुमाळ, सुशांत कदम ,तुषार भोसले, यांनी तपासात सहभाग घेतला होता.

## मुरबाडमध्ये माजी उपसरपंचाकडून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**कल्याण: विशेष प्रतिनिधी**

मुरबाड तालुक्यातील एका गावात पंधरा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर पीडित मुलगी राहत असलेल्या गावातील एका रहिवाशाने लैंगिक अत्याचार केला आहे. हा रहिवासी यापूर्वी गावचा उपसरपंच होता. पीडित मुलीच्या आई-वडिलांनी याप्रकरणी मुरबाड पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार कायद्याने गुन्हा दाखल करून संबंधित रहिवाशाला सोमवारी अटक केली. पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, की मुरबाड तालुक्यातील एका गावात पीडित मुलगी राहते. तिच्या घराच्या शेजारी माजी उपसरपंचाचे घर आहे. पीडित मुलगी दहावीत




इयत्तेत शिक्षण घेते. पीडितेला दहावीच्या अभ्यासाविषयी मार्गदर्शन करण्याच्या बहाण्याने माजी उपसरपंच पीडितेला घराजवळील एका पडक्या घरात बोलावून तिथे तिच्यावर लैंगिक अत्याचार करत होता. या प्रकाराविषयी बाहेर कोणाला न सांगण्याची धमकी माजी उपसरपंचाने दिली होती. त्यामुळे पीडित मुलगी घडत असलेला प्रकार सहन करत होती. पीडित मुलीचे आई, वडिल पुण्याजवळ एका कंपनीत सेवक म्हणून काम करतात. माजी उपसरपंचाकडून लैंगिक अत्याचाराचे प्रकार वाढत चालल्याने पीडित मुलगी अस्वस्थ होती.

## पोलीस कर्मचाऱ्याच्या पत्नीची गळफास घेऊन आत्महत्या

**पुणे : विशेष प्रतिनिधी**

स्वारगेट पोलीस वसाहतीत राहत असलेल्या पोलीस पत्नीने ओढणीच्या साह्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. याघटनेने पोलीस लाईनमध्ये खळबळ उडाली. तिने आत्महत्या नेमकी कोणत्या कारणातून केली, हे मात्र अद्याप समजू शकलेले नाही. याप्रकरणी खडक पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. ज्योती कैलास बर्डे (वय २१) असे आत्महत्या केलेल्या पोलीस पत्नीचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ज्योती बर्डे यांचे पती कैलास हे पुणे शहर पोलीस दलात नियुक्तीस आहेत. ज्योती या पतीसोबत स्वारगेट येथील कर्मचाऱ्यासाठी असलेल्या शासकीय निवासस्थानात राहत होत्या. शुक्रवारी (दि ६) दुपारी



अडीचच्या सुमारास त्यांनी राहत्या घरी ओढणीच्या साह्याने गळफास घेतला. ज्योती यांनी जेव्हा गळफास घेतला तेव्हा त्यांचा भाऊ घरी होता. त्याने ज्योती यांना खाली उतरवले. याबाबत खडक पोलिसांना माहिती देण्यात आली. उपचारासाठी ज्योती यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. नंतर त्यांचा मृतदेह ससून रुग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी पाठविण्यात आला. घटनास्थळी खडक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शशिकांत चव्हाण यांनी भेट दिली. पोलिसांना ज्योती यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेली कोणतीही चिठ्ठी मिळून आलेली नाही. त्यामुळे त्यांनी आत्महत्या कोणत्या कारणातून केली हे मात्र समजू शकलेले नाही. पुढील तपास खडक पोलिस करीत आहेत.

## ऑनलाईन जुगार हरल्याने झाला कर्जबाजारी, मिरा रोडमधील तरुण बनला चोर

**भाईंदर : विशेष प्रतिनिधी**

**ऑनलाईन जुगारात पैसे हरल्याने कर्जबाजारी झालेल्या तरुणाने चक्क चोरीचा मार्ग निवडला. एका वृद्ध महिलेला घरात डांबून तिच्या सोन्याच्या बांगड्या त्याने चोरल्या. मात्र नयानगर पोलिसांनी आरोपीला ४८ तासांच्या आत बेड्या ठोकल्या.**

मिरा रोडमध्ये ७२ वर्षीय वृद्ध महिलेला तब्बल आठ तास घरात डाबून ठेवून तीच्या बांगड्या घेऊन फरार झालेल्या चोराला पकडण्यात नया नगर पोलिसांना यश मिळाले आहे. ऑनलाईन जुगारात कर्जबाजारी झाल्याने हे कृत्य केल्याचे पोलिसांनी सांगितले. कबुली आरोपीने पोलिसांकडे दिली आहे. नया नगर येथील लक्ष्मी पार्क इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर फातीमा जुवाले (७२) नामक वृद्ध महिला एकट्याच घरी राहतात. बुधवारी रात्री ९.३० च्या सुमारास एक इसम इलेक्ट्रिशन असल्याचे सांगून महिलेच्या घरात घुसला. आणि त्याने घराचे दार आतून लावून घेतले. महिलेला इसमावर लगेचच संशय आल्याने तिने आरडा- ओरडा करण्यास सुरुवात केली. त्यामुळे चोराने महिलेला मारहाण करून गप्प केले. घरात शोधाशोध केल्यानंतरही काही न सापडल्यामुळे त्याने वृद्ध महिलेच्या हातातील सोन्याची बांगडी




काढून घेतली. मात्र इमारतीखालील दुकाने सुरू असल्यामुळे पळ काढणे कठीण होणार असल्याचे लक्षात येताच त्याने तब्बल आठ तास घरात तळ ठोकला. तसेच याबाबतची माहिती कोणाला दिल्यास पुन्हा येऊन जीव मारणार असल्याची तो भीती दाखवत होता. या दरम्यान त्याने अनेक वेळा महिलेला मारहाण करून गळा आवळण्याचा प्रयत्न केला. सकाळी पाचच्या सुमारास चोराने पळ काढला. परंतु जखमी अवस्थेत पडलेल्या महिलेला सकाळी उशिरा जाग आली. या घटनेची माहिती तिच्या नातेवाईकांना मिळताच त्यांनी सायंकाळच्या सुमारास नया नगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. या प्रकरणी नया नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नया नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अमर जगदाळे यांच्या पथकाने परिसरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने ४८ तासाच्या आत आरोपीला अटक केली. मोहम्मद सलीम चौधरी असे या आरोपीचे नाव आहे. तो तय्यब ज्वेलर्स नामक एका कंपनीचा कर्मचारी आहे. गेल्या काही महिन्यात ऑनलाईन जुगार खेळात ३ लाख गमावले होते. यामुळे तो कर्जबाजारी झाला होता. त्यामुळे त्याने कर्जाची परतफेड करण्यासाठी ही चोरी केल्याचे पोलिसांनी सांगितले.

## प्रेमसंबंधाच्या संशयावरून तरुणाची हत्या: अल्पवयीन मुलासह एकाला अटक

**पिंपरी: विशेष प्रतिनिधी**

एका नातेवाईक महिलेशी प्रेमसंबंध असल्याच्या संशयातून धारदार शस्त्राने वार करून एका तरुणाची हत्या करण्यात आला होती. ही घटना गुरुवारी (५ डिसेंबर) सायंकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास चऱ्होली येथे घडली. अवघ्या १२ तासांच्या आता पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाने एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. सचिनकुमार लखींदर राय (२३, रा. पोलीस हवालदार आशिष बोटके यांना मिळालेल्या माहितीवरून आणि सहायक फौजदार सुनील कानगुडे यांनी केलेल्या तांत्रिक विशूेषणावरून काळाखडक, वाकड येथून पहाटे सव्वातीन वाजताच्या सुमारास आरोपीला ताब्यात घेतले. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणात हत्या झालेले सचिनकुमार राय याचे आरोपीचे नातेवाईक महिलेशी प्रेमसंबंध असल्याचा संशय आरोपीला




बंगरी, जि. मुझफ्फरपुर, बिहार) असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. गौतम रामानंद राय ( २२, रा. तेजस रेसीडन्सी, मंगलनगर, वाकड. मूळगाव मु. बंगरी पो. मरवन ता. काटी जि. मुजफ्फरपूर, राज्य-बिहार) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर त्याचा अल्पवयीन साथीदार (वय १७ वर्ष ६ महिने, रा. मोहीतेवाडी, ता. मावळ, जि. पुणे) यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, चऱ्होली येथे सचिनकुमार राय याचा खून झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार खंडणी विरोधी पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आसपासचे सीसीटीव्ही तपासले असता त्यावरून आरोपी गौतम राय याचे नाव निष्पन्न केले. होता. या कारणावरून नातेवाईक महिलेने घरही सोडले होते. त्यामुळे सचिनकुमार याला धडा शिकविण्यासाठी त्याचा खून केल्याचे आरोपीने पोलिसांना सांगितले. खंडणी विरोधी पथकाने आरोपीला दिघी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह आयुक्त, डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त संदिप डोईफोडे, सहायक आयुक्त बाळासाहेब कोपनर, डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, सहाय्यक फौजदार सुनील कानगुडे, अंमलदार प्रदीप गोडांबे, आशिष बोटके, चंद्रकांत जाधव, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, मंगेश जाधव तसेच तांत्रिक विशूेषण विभागातील नागेश माळी यांच्या पथकाने केली आहे.

## सलमान खानच्या घराबाहेरील गोळीबार प्रकरण: आरोपी अनुज थापनचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळे नाही – उच्च न्यायालय

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

अभिनेता सलमान खान याच्या घराबाहेरील गोळीबार प्रकरणातील आरोपी अनुज थापन याचा मृत्यू कोठडीतील पोलिसांच्या मारहाणीमुळे झाल्याचे दिसून येत नाही, असे उच्च न्यायालयाने शुक्रवारी न्यायदंडाधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालाचा संदर्भ देताना स्पष्ट केले. अनुज हा तपासात सहकार्य करू शकला असता व माफीचा साक्षीदार होऊ शकला असता ही बाब लक्षात घेता पोलिसांनी त्याला कोणत्याही प्रकारची इजा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.

अनुज याच्या कोठडी मृत्युच्या चौकशीचा मोहोरबंग अहवाल न्यायदंडाधिकाऱ्यांनी शुक्रवारी सादर केला. तो वाचल्यानंतर त्यानुसार, अनुजचा कोठडीतील मारहाणीमुळे मृत्यू झाल्याच्या आरोपात काहीच तथ्य असल्याचे न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अहवालावरून प्रतित होत नाही, असे न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. त्याचवेळी, अनुजच्या आईने त्याच्या मृत्यूबाबत संशय निर्माण करणेही समजण्यासारखे असल्याचे न्यायालयाने म्हटले.

अनुजच्या आईचा अविश्वास



समजण्यासारखा असला तरी एखाद्याला आत्महत्येला कशामुळे भाग पाडले जाते, हे ठरवणे अवघड आहे, अशी टिप्पणीही खंडपीठाने केली. कोणीही कुणालाही चांगले ओळखत नाही. तसेच, संबंधित वेळी माणसाच्या मनात काय चालले आहे हेही कुणीच सांगू शकत नाही. त्यामुळेच आत्महत्या होत असल्याचेही न्यायमूर्ती डेरे यांनी नमूद केले. पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद घटनेच्या दिवशीच्या चित्रिकरणाचा न्यायालयाने यावेळी दाखला दिला. त्यानुसार, घटनेच्या आधी थापन अस्वस्थ आणि त्याच्या कोठडीत फिरताना, नंतर एकटाच शौचालयात शिरताना दिसत आहे. सीसीटीव्हीत कैद चित्रण विचारात घेता अनुजनंतर शौचालयात कोणीही गेले नाही. त्यामुळे, त्याचा पाठलाग करण्यात आल्याची शक्यता नाही. तसे झाले असते आणि कोणी अनुजला मारले असते तर त्याने त्याला प्रतिकार केला असता. परंतु, तसेही काही झालेले दिसत नसल्याचे न्यायमूर्ती चव्हाण यांनी अधोरेखित केले.

## डॉ. पायल तडवी आत्महत्या प्रकरण : नायर रुग्णालयाच्या तत्कालीन विभागप्रमुखांना आरोपी करा, सरकारी पक्षाची विशेष न्यायालयाकडे मागणी

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

डॉ. पायल तडवी आत्महत्या प्रकरणात नायर रुग्णालयाच्या संबंधित विभागाच्या तत्कालीन प्रमुख आणि प्राध्यापक डॉ. चिंग लिंग चुंग चियांग यांना आरोपी करावे, अशी मागणी सरकारी पक्षातर्फे विशेष न्यायालयात करण्यात आली.

डॉ. पायल यांनी वारंवार तक्रारी करूनही डॉक्टर चिंग यांनी तिन्ही आरोपी डॉक्टरांविरुद्ध कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे, आरोपींनी डॉ. पायल यांना त्रास देणे सुरूच ठेवले, असा दावा सरकारी पक्षाने उपरोक्त मागणी करताना केला. विशेष न्यायालयाने सरकारी पक्षाच्या मागणीची दखल घेऊन त्यावर सर्व पक्षकारांना भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. दरम्यान, डॉ. अंकिता खंडेलवाल, डॉ. भक्ती मेहेरे आणि डॉ. हेमा अहुजा या तिघींवर डॉ. पायल यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. या तिघींना उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. त्यानंतर, या तिघींनी त्यांना प्रकरणातून दोषमुक्त करण्याची मागणी विशेष न्यायालयात केली होती. ती मान्य करण्यास विशेष न्यायालयाने नकार दिला होता.

डॉ. पायल तणावाखाली होत्या आणि कामाचा ताण सहन करू शकल्या नाहीत. त्याच कारणास्तव त्यांनी आत्महत्या केल्याचे भरपूर पुरावे आहेत, असा दावा आरोपींनी दोषमुक्तीची



मागणी करताना केला होता. पायल अनुसूचित जमातीतील असल्याची आपल्याला कुठल्याही प्रकारची कल्पना नव्हती. त्यामुळे, जातीवरून तिची छळवणूक केल्याचा आणि तिला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचा आरोप तथ्यहीन असल्याचा दावाही तिघींनी केला होता.

डॉ. पायल हिने २२ मे २०१९ रोजी नायर रुग्णालयाच्या वसतिगृहामध्ये गळफास लावून आत्महत्या केली होती. तिच्यावर सतत जातीवाचक शेरेबाजी करुन तिचा मानसिक छळ केल्यामुळे तिने आत्महत्या केल्याचा आरोप तिच्या कुटुंबियांनी केला. त्यानंतर, पोलिसांनी या प्रकरणी आरोपींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (ॲट्रोसिटी) गुन्हा दाखल केला होता.

## मेट्रो ९ च्या कामादरम्यान सिमेंट मिक्सर ऑपरेटरचा मृत्यू, कंत्राटदार आणि सल्लागारास मोठा दंड, चौकशीसाठी समिती स्थापन

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

दहिसर ते मीरारोड मेट्रो ९ मार्गिकेतील मिरागाव मेट्रो स्थानकाच्या कामादरम्यान बुधवारी रात्री साडेदहाच्या सुमारास एक दुर्घटना घडली. या दुर्घटनेत सिमेंट मिक्सर ऑपरेटरचा मृत्यू झाला. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडी) कंत्राटदार जे. कुमारला ३० लाखांचा दंड ठोठावला आहे. तर सल्लागार कंपनीला १० लाखांचा दंड आकारला आहे. त्याचवेळी मृताच्या नातेवाईकांना तातडीने दोन लाखांची मदत दिली असून या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्वतंत्र चौकशी समितीची स्थापन केली आहे. या समितीच्या अहवालानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे.

एमएमआरडीएकडून मेट्रो ९ चे काम सुरु आहे. बुधवारी रात्री साडेदहा वाजता मिरागाव मेट्रो स्थानकातील आव्हानात्मक काम सुरु होते. या कामादरम्यान सिमेंट मिक्सर बाजूच्याच खोदलेल्या एका खड्डयात पडला. कंत्राटदार आणि एमएमआरडीएकडून तात्काळ बचावकार्य सुरु करत ऑपरेटरला बाहेर काढले.



या दुर्घटनेत सिमेंट मिक्सर ऑपरेटर गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या दुर्घटनेची गंभीर दखल घेत महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी कंत्राटदार जे. कुमारला १० लाख रुपये तर सल्लागार मे. सिस्ट्रा कन्सोटिऱ्यम कंपनीला १० लाखांचा दंड ठोठावला आहे. प्रत्येक प्रकल्पाच्या कामादरम्यान शून्य अपघाताचे धोरण निश्चित करत या धोरणाच्या कठोर अंमलबजाणीचे निर्देश सर्व कंत्राटदारांना दिले आहेत. असे असताना या प्रकल्पात ही दुर्घटना घडल्याने कंत्राटदार आणि सल्लागाराविरोधात तातडीने दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तर या प्रकरणाच्या चौकशीसाठी एक स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली असून या समितीच्या अहवालानंतर दोषींविरोधात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे एमएमआरडीएकडून सांगण्यात आले आहे.

मृताच्या नातेवाईकांना तात्काळ दोन लाखांची मदत करण्यात आली आहे. कामगार भरपाई कायदा तसेच इमारत आणि बांधकाम कायद्याअंतर्गत आवश्यक ती मदतही नातेवाईकांना केली जाणार आहे.


# विकासाची गती कायम; देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही; 'लाडक्या बहिणीं'ना २१०० रुपयांसाठी अर्थसंकल्पापर्यंत प्रतीक्षा

■ मुंबई : गणेश बागडे

राज्यात महायुतीच्या सरकारमध्ये आमच्या भूमिका बदलल्या असल्या तरी गेल्या अडीच वर्षात राज्याने विकासाची जी गती घेतली आहे. त्याच गतीने महाराष्ट्र पुढे जाईल. महाराष्ट्र आता थांबणार नाही तर सर्व क्षेत्रांत राज्य अग्रेसर राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्वीकारल्यानंतर गुरुवारी दिली.

महायुती सरकारच्या शपथविधीनंतर नव्या सरकारची पहिली मंत्रिमंडळ बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी सरकारची पुढील दिशा स्पष्ट केली. निवडणुकीच्या दरम्यान लोकांना दिलेल्या सर्व आश्वासनांची पूर्तता सरकार करेल. मात्र त्यापूर्वी राज्याची वित्तीय स्थिती विचारात घेतली जाईल. लाडक्या बहिणींच्या सन्माननिधीत वाढ करण्याचा निर्णय अर्थसंकल्प मांडताना घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नदीजोड प्रकल्प आणि सौरऊर्जा तसेच पायाभूत सुविधा प्रकल्पांना आपल्या सरकारचे प्राधान्य राहणार आहे. २०२६पर्यंत राज्यात सौरऊर्जेचे १६ हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून नदीजोड प्रकल्पाची कामे सुरू केली जातील. शेतकऱ्यांच्या कर्जमाफी योजनेची अंमलबजावणी करण्याची घोषणा फडणवीस यांनी यावेळी केली. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गामुळे मराठवाडा विदर्भाचा विकास होत असून या भागात नवीन उद्योग येत आहेत. आता नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाला गती देण्यात येणार असून या प्रकल्पाला सांगली जिल्ह्यापर्यंत कोणताही विरोध नाही, त्यामुळे तेथे महामार्गाचे आरेखन अंतिम करून पुढील प्रक्रिया सुरू केली जाईल, मात्र या प्रकल्पाला कोल्हापूर जिल्ह्यात प्रचंड विरोध होत असून शेतकऱ्यांशी चर्चा करूनच प्रकल्प पुढे नेला जाईल. विरोध कायम राहिला तर हा मार्ग सध्याच्या महामार्गाला जोडण्याबाबत किंवा त्याची दिशा बदलण्याबाबत



विचार केला जाईल, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. विरोधकांचे संख्याबळावरून मूल्यमापन करणार नाही तर त्यांनी योग्य विषय मांडल्यास त्यांचा सन्मान केला जाईल. तसेच विधिमंडळात विरोधी पक्षनेत्याबाबत अध्यक्ष जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल. राज्यातील सध्याच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत सरकार सजग राहणार असून या योजनांचे सामाजिक परीक्षण करण्याची व्यवस्था केली जाईल, असे फडणवीस म्हणाले.

**राजकीय संवाद राखणार**

राज्यात गेल्या पाच वर्षात बरीच उलथापालथ झाली. बऱ्याच घटना घडल्या. मात्र येत्या काळात राज्यातील राजकीय संवाद संपणार नाही, याची खबरदारी सरकार घेईल. राजकीय संवाद वाढला पाहिजे, तो कधी संपणार नाही याची खबरदारी सर्वच राजकीय पक्षांनी घेण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. गरज वाटल्यास शक्ती कायद्यात काही बदल केले जातील, असे फडणवीस यांनी सांगितले.

तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतरची त्यांची ही पहिलीच स्वाक्षरी होती. पुण्यातील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती. २०१४ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचा प्रारंभ केला होता.

जनतेच्या अपेक्षांची पूर्ती करण्यासाठी अधिक वेगाने काम करण्याच्या सूचना नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळाच्या पहिल्याच बैठकीत गुरुवारी दिल्या. फडणवीस यांनी शपथविधी सोहळा झाल्यानंतर मंत्रालयात जाऊन मंत्रिमंडळाची पहिली बैठक घेतली. त्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार उपस्थित होते. या बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी फडणवीस, शिंदे व पवार यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना कामकाजाबाबत काही सूचना केल्या आणि अधिक गतीने व जोमाने काम करण्यास सांगितले. जनतेच्या सरकारकडून बऱ्याच अपेक्षा आहेत. त्यासाठी आपल्याला अधिक वेगाने काम करावे लागेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रशासनाची गती वाढवून चांगले निर्णय घेऊ. जनतेच्या अडीअडचणी व समस्या समजावून घेऊ, असे ते म्हणाले.

# तृतीयपंथी समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केडीएमसी करणार तृतीयपंथीयांच्या धोरणाची अंमलबाजवणी

■ ठाणे : तृप्ती गोरे

किन्नर समुदाय हा समाजातील एक दुर्लक्षित, उपेक्षित समाज आहे, या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार महापालिकेच्या समाज विकास विभागाचे



उपायुक्त संजय जाधव यांनी आज अस्मिता किन्नर संस्थेच्या कल्याण पूर्व येथील कार्यालयास समक्ष भेट देऊन तेथील किन्नर पंथीयांशी संवाद साधला. त्यांच्याशी चर्चा करत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि समाजातील या दुर्लक्षित घटकास मुख्य प्रवाहात आणून मानसन्मानाने जगण्यासाठी काय उपाययोजना करता येतील याबाबत किन्नर पंथाच्या गुरू नीता केणे यांचेशी सविस्तर चर्चा केली. किन्नर पंथीयाची प्रथम महापालिकेकडे नोंदणी करून त्यांचे मनोगत, त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी त्यांच्यासाठी प्रथमतः महापालिकेच्या नाट्यगृहात किन्नर महोत्सव आयोजित केला जाईल. किन्नर पंथीयांचे बचत गट तयार करून त्यांना व्यवसायभिमुख प्रशिक्षण देऊन उदर निर्वाहासाठी मार्केट उपलब्ध करून त्यांच्या उपजीविकेसाठी महापालिकेमार्फत सहकार्य केले जाईल असे आश्वासन उपायुक्त संजय जाधव यांनी यावेळी तेथे उपस्थित असलेल्या किन्नर पंथीयांना दिले. किन्नर समुदायाने महापालिकेच्या उपक्रमांमध्ये सहकार्य करण्याचे आश्वासन देऊन महापालिका करीत असलेल्या सहकार्याबाबत समाधान व्यक्त केले आणि महापालिका आयुक्त स्वतः डॉक्टर असल्यामुळे त्यांनी त्यांच्याशी हितगुज करण्यासाठी वेळ मागितली आहे. आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरच किन्नर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याच्या तृतीयपंथी धोरण २०२४ ला १२ मार्च २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, दिव्यांग कल्याण विभाग, इतर मागास आणि बहुजन कल्याण विभाग, कौशल्य आणि उद्योजकता विभाग, उद्योग, उर्जा आणि कामगार विभाग, पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभाग, आदिवासी विकास विभाग, अन्न आणि नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग, ग्रामविकास आणि पंचायतराज विभाग, अल्पसंख्यांक विभाग, रोजगार हमी योजना प्रभाग आणि उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग आदी विभागांच्या योजना विहित निकषांनुसार पात्र तृतीयपंथी लाभार्थ्यांना लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

# ड्रीम स्पोर्ट्स फाउंडेशन व एम.एस.एस.ए यांच्या भागीदारीतून 'मुंबई' बनणार क्रीडा केंद्र

■ मुंबई : विशाल कारंडे

ड्रीम स्पोर्ट्स या प्रख्यात क्रीडा संस्थेच्या, ड्रीम स्पोर्ट्स फाउंडेशन (डी.एस.एफ) या सामाजिक सेवा विभागाने, भारतातील सर्वात जुन्या व प्रतिष्ठित शालेय क्रीडा संस्थांपैकी एक असलेल्या मुंबई स्कूल स्पोर्ट्स असोसिएशन (एम.एस.एस.ए) यांच्याशी पाच वर्षासाठी भागीदारी करण्याची घोषणा केली. या करारानुसार मुंबई शालेय क्रीडा क्षेत्रातील एकूण २० क्रीडा क्षेत्रांचा विकास करण्यात येणार असून, त्यामध्ये हॉकी, फुटबॉल, क्रिकेट, ॲथलिटिक, टेबल टेनिस व बॅडमिंटन या खेळांवर विशेष लक्ष्य देण्यात येणार आहे. दिलीप वेंगसरकर, सचिन तेंडुलकर, अजित आगरकर, यशस्वी जयस्वाल, पृथ्वी शॉ आणि यांच्यासारखे अनेक दिग्गज खेळाडू त्यांच्या तारुण्यात, स्पर्धामध्ये खेळून घडले असून, शहरातील क्रीडा विकासात एमएसएसएने ऐतिहासिक भूमिका बजावली आहे. एमएसएसए यांनी डीएसएफच्या प्रयत्नातून क्रिडा क्षेत्रातील युवा खेळाडूंमध्ये स्पर्धात्मकता आणि कौशल्य वाढवण्यासाठी एक महत्वाचे पाऊल उचलले आहे. एमएसएसए

आणि डीएसएफच्या एकत्रित काम करण्यामुळे तळागाळातील क्रिडा गुणवत्तेचा विकास शक्य आहे. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२४ यानुसार, स्पर्धा आयोजनातील दर्जा उंचावण्याचे या भागीदारीचे उद्देश्य आहे. ड्रीम स्पोर्ट्स फाउंडेशनचे मुख्य संचालन अधिकारी व सह संस्थापक श्री.भावित शेठ म्हणाले, 'मुंबई स्कूल स्पोर्टस असोसिएशन बरोबर जोडले गेल्यामुळे, मुंबईच्या पायाभूत स्तरावर रुजलेल्या क्रीडा संस्कृतीशी सुद्धा जोडले जाण्याचा आम्हाला अभिमान वाटत आहे. भारतीय क्रीडा क्षेत्राचा विकास करण्याच्या आमच्या मोहिमेशी ही योजना मिळती जुळती असून, मुंबईतील युवा खेळाडूंना पाठिंबा देऊन त्यांच्यातील गुणवत्तेला प्रोत्साहन देण्याचा आणि भारताला क्रीडा महाशक्ती बनविण्याचा आमचा हा प्रयत्न आहे.' या भागीदारीच्या माध्यमातून मुंबईतील हजारो शालेय खेळाडूंमधील शिस्त व तंदुरुस्ती यात वेगाने सुधारणा करून, स्थानिक स्पर्धांचा दर्जा उंचावण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच, युवा खेळाडूंना शारीरिक शिक्षण, प्रशिक्षक व क्रीडा प्रशिक्षक या सर्वांना आधुनिक प्रशिक्षण देऊन त्यांचाही दर्जा उंचावण्याचा डीएसएफचा प्रयत्न आहे. मुंबई स्कूल स्पोर्टस असोसिएशनचे अध्यक्ष श्री.रेव्हरंड ज्युड रॉड्रिक्स म्हणाले, 'ड्रीम स्पोर्ट्स फाउंडेशनशी भागीदारी केल्यामुळे मुंबईच्या क्रीडा क्षेत्राचे भवितव्य उज्वल व्हावे यासाठी आम्ही निश्चितपणे आगेकूच केली आहे. तसेच, या भागीदारीमुळे डीएसएफच्या महत्वाकांक्षी व भविष्याला गवसणी घालणाऱ्या योजनांच्या साहाय्याने मुंबईतील खेळाडू निश्चितपणे वेगाने प्रगती करतील अशी आमची खात्री आहे. इतकेच नव्हे तर मुंबईच्या दैदिप्यमान क्रीडा परंपरेच्या नव्या प्रवासाचा प्रारंभ होणार आहे.'

# वंचितही ईव्हीएमविरोधात आक्रमक, थेट निवडणूक आयोगाला पत्र; विचारले 'हे' तीन प्रश्न

■ मुंबई : नितीन देवळेकर

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर जवळपास सर्वच विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला आहे. सत्ताधाऱ्यांनी ईव्हीएममध्ये घोळ करून ही निवडणूक जिंकली असल्याचा दावा केला जात आहे. त्याचबरोबर मतदानाच्या दिवशी सायंकाळी ५ वाजल्यानंतर ७५ लाखांहून अधिक लोकांनी




मतदान केल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली होती. अनेक ठिकाणी रात्री ११.३० वाजेपर्यंत मतदान चालू होतं असंही सांगण्यात आलं होतं. या आकडेवारीवर विरोधी पक्षांनी संशय व्यक्त केला आहे. अशातच वंचित बहुजन आघाडीने देखील निवडणूक प्रक्रियेवर संशय व्यक्त करत निवडणूक आयोगाला एक पत्र पाठवलं आहे. या पत्राद्वारे वंचितने निवडणूक आयोगाला तीन प्रश्न विचारले आहेत.

वंचितने आपल्या पत्रात म्हटलं आहे की 'नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीशी संबंधित अतिशय गंभीर प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी आम्ही तुम्हाला (राज्य मुख्य निवडणूक आयुक्त) पत्र लिहित आहोत. नुकत्याच पार पडलेल्या निवडणूक प्रक्रियेवरील आमचा विश्वास डळमळीत आणि घसरला असल्याने आम्ही ही उत्तरे शोधत आहोत; निवडणुका प्रलोभनमुक्त आणि पारदर्शक नव्हत्या यावर विश्वास ठेवण्याची आमच्याकडे कारणे आहेत. एका मुलाखतीत, माजी मुख्य निवडणूक आयुक्त यांनी तात्पुरत्या मतदारांच्या मतदानाची आकडेवारी आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील अंतिम डेटा यांच्यातील व्यापक तफावताबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. संध्याकाळी ५ वाजता मतदानाची टक्केवारी ५८.२२ टक्के होती, आणि मतमोजणी जाहीर झालेल्या अंतिम मतदानाची टक्केवारी आश्चर्यकारकपणे ७.८३ टक्क्यांनी वाढून ६६.०५ टक्के झाली आहे'.

# खेड तालुक्यात हुतात्मा राजगुरु प्रिमियर लिग R.P.L 2024 क्रिकेट स्पर्धा संपन्न




■ पुणे : विशेष प्रतिनिधी

खेड तालुक्याची मानाची क्रिकेट स्पर्धा म्हणून हुतात्मा राजगुरु प्रिमियर लिग ची ओळख आहे. हे स्पर्धेचे ५ वे वर्षे असून दिनांक २ डिसेंबर २०२४ ते ८ डिसेंबर २०२४ रोजी क्रिडा संकुलन राजगुरुनगर ता.खेड, जि.पुणे. येथे हुतात्मा राजगुरु प्रिमियर लिग R.P.L 2024 चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकुण १२ संघ खेळले IPLप्रमाणे ऑक्शन संपन्न करुन सर्व संघमालकांनी खेळाडु वर पॉईट नुसार बोली लावुन आपल्या संघात घेतले होते, व एक ALL INDIA OPEN ICON तसेच एक आयडॉल खेळाडु शेजारील तालुक्यातील घेऊन संघ निवड प्रकिया झाली होती. सात दिवस प्रेक्षकांसाठी देखील लक्की ड्रॉ ठेवला होता. प्रत्येक दिवशी एक स्पोर्टस तसेच फायनलसाठी देखील भरपुर बक्षीसे प्रेक्षकांना देऊन सन्मानित करण्यात आले. फायनल दिवशी प्रेक्षकांना भोजन व्यवस्था देखील ठेवण्यात आली होती. प्रेक्षकांनी




देखील भरपुर स्पर्धेचा आनंद घेतला व प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद स्पर्धेला लाभला स्पर्धेचे यशस्वी आयोजन व नियोजन संपन्न झाले. या स्पर्धेचे आयोजन बाळासाहेब कडलग साहेब, समीरशेठ सातकर पाटील, आशुभाऊ भंडलकर, राहुलशेठ थिगळे, जावेदभाई तांबोळी) महेशभाऊ चव्हाण, काळुराम अण्णा मिंडे, राहुलशेठ पानमंद, प्रमोद गडदे, ऋषी चाफळे, योगेश शिवेकर, अमित कोकणे, स्वप्निल बाप्पुशेठ खुटवड, दत्ता पवार, साबिरभाई शेख, सचिनभाऊ गोपाळे, उत्तम सावंत यांनी केले होते तर हुतात्मा राजगुरु प्रिमियर लिग कमिटी खेड तालुका यांचे सहकार्य लाभले होते.

- ***प्रथम पारितोषिक :*** *१,००,००० /- व चषक विजेता संघ दिशा स्पोर्टस फाऊंडेशन साकुर्डी*
- ***द्वितीय पारितोषिक :*** *७१,००० /- व चषक विजेता संघ मैत्री ग्रुप स्पोर्टस फाऊंडेशन खेड वेताळे वाडा येलवाडी*
- ***तृतीय पारितोषिक :*** *५१,००० /- व चषक विजेता संघ श्रीपती बाबा महाराज क्रिकेट कूब महालुंगे इं.*
- ***चतुर्थ पारितोषिक :*** *५१,००० /- व चषक विजेता संघ ओम साई ११ शेलु / भांबोली*
- ***फायनल मॅन ऑफ द मॅच चषक :*** *शेखर रणपिसे*
- ***मॅन ऑफ द सिरीज टु व्हिलर बाईक व चषक :*** *गणेश घुंडरे*
- ***उत्कृस्ट फलंदाज स्पोर्टस सायकल व चषक :*** *सचिन बर्गे*
- ***उत्कृस्ट गोलंदाज स्पोर्टस सायकल व चषक :*** *अमित राऊत*

# बाह्यवळण रस्ते मार्गातील अटाळी येथील १२५ बांधकामे जमीनदोस्त

■ मुंबई : सम्यक कासारे

टिटवाळा-कल्याण-डोंबिवली ते शिळफाटा दरम्यानच्या ३० किलोमीटर लांबीच्या बाह्यवळण रस्ते मार्गात अडथळा ठरणारी १२५ बांधकामे कल्याण डोंबिवली पालिकेच्या अ प्रभागाच्या अतिक्रमण नियंत्रण पथकाने शुक्रवारी जमीनदोस्त केली. या कारवाईमुळे मागील काही वर्षापासून अटाळी भागात रखडलेला बाह्यवळण रस्ते मार्गाचा टप्पा बांधणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत टिटवाळा-आंबिवली अटाळी-गांधारे पूल-वाडेघर ते दुर्गाडी किल्ला-पत्रीपूल ते मोठागाव-कोपर-भोपर ते शिळफाटा- काटई-हेदुटणे असा ३० किलोमीटर लांबीचा कल्याण-डोंबिवली शहराबाहेरून जाणारा बाह्यवळण रस्ता उभारणीचे काम सुरू आहे. या रस्त्यामधील टिटवाळा ते वाडेघरपर्यंतचे रस्ते बांधणीचे टप्पे पूर्ण झाले आहेत. या टप्प्यामधील अटाळी भागात वळण रस्त्याच्या मार्गात १२५ चाळ, झोपड्यांची बांधकामे होती.

या रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न काही वर्षापासून रखडला होता. हा प्रश्न आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या पुढाकाराने मार्गी लागला. त्यामुळे आयुक्त डॉ. जाखड यांच्या आदेशावरून अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संदीप रोकडे यांनी अतिक्रमण नियंत्रण, फेरीवाला हटाव पथक, जेसीबी आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत शुक्रवारी दिवसभरात अटाळी भागातील वळण रस्ते कामाला अडथळा ठरणारी १२५ बांधकामे जमीनदोस्त केली.

वळण रस्ते मार्गात अटाळी येथे बांधकामे असल्याने एमएमआरडीएला त्या भागात रस्ता बांधणीचे काम करता येत नव्हते. पालिकेने रस्त्यासाठी जमिनीचे संपादन करून ती जमीन एमएमआरडीएला रस्ते कामासाठी हस्तांतरित करायची आहे. जमीन भूसंपादन आणि हस्तांतरणाचे काम पालिकेकडून केले जात नसल्याने अटाळीतील काम अनेक वर्ष रखडले होते.

या वळण रस्ते कामातील दुर्गाडी किल्ला-पत्रीपूल ते ठाकुर्ली-खंबाळपाडा (खाडी किनारा भाग), डोंबिवलीतील गणेशनगर, राजूनगर, देवीचापाडा ते मोठागाव माणकोली पुलापर्यंतच्या वळण रस्ते मार्गाचे काम एमएमआरडीएने सुरू केले आहे. या कामासाठीची बहुतांशी जमीन पालिकेने एमएमआरडीएला हस्तांतरित केली आहे. या कामासाठी सुमारे ३५१ कोटीचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

